# “ पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधेतून शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठीची आकांक्षा ”

या विषयावरील

## गाव संसाधन गटाच्या प्रशिक्षणाच्या सुलभीकरणासाठीची

# मार्गदर्शक पुस्तिका









१. मार्गदर्शक पुस्तिकेविषयी_०३

२. प्रशिक्षणाची थोडक्यात माहिती_ ०६

३. प्रशिक्षणाची रूपरेषा_०७

४. प्रशिक्षणाचे वेळापत्रक_१०

५. सत्र सुलभिकरणाची प्रक्रिया_१२

६. परिशिष्ट

# १ मार्गदर्शक पुस्तिकेविषयी

## पार्श्वभूमी

जल जीवन मिशनअंतर्गत देशात पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधांच्या निर्मितीचे काम मोठ्या वेगाने सुरु आहे, तर महाराष्ट्र राज्यात सदर कार्यक्रम अंतिम टप्प्यात आहे. राज्यात जल जीवन मिशन अंतर्गत बऱ्याच योजना पूर्ण झाल्या आहेत/पुनर्जोडणी केल्या गेल्या आहेत आणि बऱ्याच योजना नियोजन किंवा अंमलबजावणीच्या टप्प्यात आहेत.

पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर योजनेचे अधिकार, मालमत्ता आणि दायित्व ग्रामपंचायतीस हस्तांतरित करताना योजेनेची संपूर्ण माहिती, योजनेच्या उपांगांचे दस्तऐवजीकरण इत्यादीं बाबी पूर्ण होणे महत्वाचे आहे. या प्रक्रियेत पाणी पुरवठा सुविधा निर्माण करणारी सेवा पुरवठादार संस्था, संबंधित शासकीय विभाग आणि ग्रामपंचायत यांच्यातील समन्वय आणि या सर्व भागधारकांची भूमिका केंद्रस्थानी आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे योजना हस्तांतरणाची प्रक्रिया तेव्हाच यशस्वी होऊ शकते जेव्हा ग्रामपंचायत या योजनेची जबाबदारी पूर्णपणे घेईल.

पाणी पुरवठा योजनेच्या शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी तसेच सुविधांच्या संचालन, देखभाल व दुरुस्तीसाठी बहुतांशी ग्रामपंचायतीमध्ये आवश्यक तांत्रिक कौशल्याचा व व्यवस्थापकीय कौशल्याचा अभाव आहे. दुसऱ्या बाजूस योजनेच्या संचालन, देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक खर्चाचे अंदाजपत्रक, त्याचबरोबर देखभाल दुरुस्तीच्या निधीचे संस्थात्मकीकरण करणे महत्वाचे आहे.

या सर्व घटकांबरोबर ग्रामपंचायत, तालुका आणि जिल्हापातळीवरील विविध भागधारकांची भूमिका व जबाबदारी सुनिश्चित करणे व या अनुषंगाने स्पष्टता आणणे तसेच गांवपातळीवरील तंत्रज्ञांचे कौशल्य विकसित करण्यासाठी केंद्रित प्रयत्न आणि तांत्रिक सेवा पुरवठादारांची उपलब्धता याकडेही पुरेसे लक्ष देणे आवश्यक आहे.

हवामानातील सातत्याने होत असलेला बदल आणि वाढत चाललेल्या पाण्याच्या मागणीमुळे भूजल पातळीत मोठ्या प्रमाणात घट होत चालली आहे, ज्याचा अप्रत्यक्ष परिणाम शेतीवर आणि भूजल स्त्रोतांवर होत आहे. महाराष्ट्रात गेल्या १० वर्षात हवामान बदलामुळे निर्माण होणा-या धोक्याच्या प्रमाणात जवळपास ५ पटीने वाढ झाली आहे. हवामानातील होत असलेल्या या बदलाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि ग्रामपंचायत स्तरावरील भागधारकांना आपत्ती प्रतिरोधक पाण्याच्या पायाभूत सुविधाबद्दल क्षमता निर्माण करणे महत्त्वाचे आहे.

या सर्व घटकानुरूप आजची गरज लक्षात घेता, पाणी व स्वच्छतेची शाश्वत सेवा प्रदान व्हावी म्हणून विशिष्ट कार्यपद्धती विकसित करण्यासाठी, जिल्हा व तालुकास्तरावरील अधिकारी प्रशिक्षक, व

साधनव्यक्ती यांची निवड करून त्यांच्यासाठी प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करणे व या प्रशिक्षकामार्फत गाव संसाधन गटांची  योग्य पद्धतीने क्षमता बांधणी करण्यासाठी ग्राम विकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, महाराष्ट्र शासन, युनिसेफ, मुंबई व प्रायमुव्ह, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ***“पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधेतून शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठीची आकांक्षा”*** या विषयावर ३ दिवशीय प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे.

सदर प्रशिक्षणाचे सुलभीकरण प्रभावीरित्या होण्यासाठी या मार्गदर्शक पुस्तिकेची निर्मिती करण्यात आली आहे.



## पुस्तिका कोणासाठी?

प्रशिक्षिणाच्या सुलभीकरणासाठी निवडण्यात आलेल्या जिल्हा व तालुकास्तरावरील अधिकारी प्रशिक्षक व साधनव्यक्तीसाठी ही प्रशिक्षण मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्यात आली आहे. प्रशिक्षण सत्राच्या सुलभीकरणासाठी निवडण्यात आलेल्या प्रशिक्षकांनी सदर पुस्तिकेचा अभ्यास करून प्रत्येक सत्राचे प्रभावीरीत्या सुलभीकरण करणे अपेक्षित आहे.



## पुस्तिकेत काय आहे?

या पुस्तिकेत प्रशिक्षणाची संक्षिप्त माहिती देण्यात आली आहे. त्यानंतर प्रशिक्षणाची रूपरेषा व वेळापत्रक देण्यात आले आहे. पुस्तिकेच्या पुढील भागात प्रशिक्षणाच्या प्रत्येक सत्राच्या प्रभावी सुलभीकरणासाठी देण्यात आलेली प्रक्रिया खालील मुददयांच्या आधारे विस्तारीतपणे मांडण्यात आली आहे.




यानंतर सदर पुस्तिकेत प्रशिक्षण पूर्व आणि पश्चात  भरावयाची प्रश्नावली, प्रशिक्षणाचा अभिप्राय नोंदविण्यासाठीचे प्रपत्र इ. जोडण्यात आले आहे.

# प्रशिक्षण पद्धती

प्रशिक्षणाच्या प्रभावी सुलभीकरणासाठी सहभागी आणि परस्पर संवादी प्रशिक्षण पद्धतींचा समावेश करण्यात आला आहे. प्रशिक्षकांनी सदर पद्धतीचा अवलंब करून अथवा त्यांच्या अनुभवानुरूप इतर प्रभावी पद्धतीचा अवलंब करून प्रशिक्षणाचे प्रभावीरीत्या सुलभीकरण करणे अपेक्षित आहे.

**समावेश करण्यात आलेल्या प्रशिक्षण पद्धती**

1. गट चर्चा
2. गट कार्य
3. खेळ
4. व्याख्यान
5. अनुभव कथन
6. खुली चर्चा
7. यशोगाथांचे सादरीकरण
8. प्रश्नोत्तर
9. प्रक्षेत्र भेट
10. चित्रफितीचे सादरीकरण
11. सादरीकरण
12. प्रात्यक्षिक

# २ प्रशिक्षणाची थोडक्यात माहिती

| घटक | तपशिल |
|---|---|
| प्रशिक्षणाचा विषय | **पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधेतून शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठीची आकांक्षा** |
| प्रशिक्षणाचा उद्देश | १. ग्रामपंचायतस्तरावर पेयजलाची शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी योग्य धोरणाची आखणी करून त्याच्या अंमलबजावणीसाठीची क्षमता निर्माण करणे<br>२. पाणी पुरवठा योजनेच्या हस्तांतरणाची प्रक्रिया आणि कार्यपद्धती स्पष्ट करणे<br>३. एकात्मिक आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनासाठी स्त्रोत बळकटीकरणाचे महत्त्व आणि त्यासाठी हाती घ्यावयाच्या उपाययोजनांची माहिती देणे<br>४. पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधांच्या तांत्रिक, संस्थात्मक आणि आर्थिक व्यवस्थापनासाठी करावयाच्या कृतीची माहिती देणे. |
| प्रशिक्षणार्थींची संख्या | ५० |
| प्रशिक्षणार्थींचा तपशिल | सरपंच, ग्रामसेवक, सदस्य -पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, पाणी पुरवठा कर्मचारी, महिला बचत गटातील सदस्य, आशा, अंगणवाडी सेविका इ. |
| प्रशिक्षणाचा कालावधी | ३ दिवस (अर्धा दिवस प्रक्षेत्र भेट ) |
| प्रशिक्षण वर्गातील सत्रांचा तपशील | ▶ प्रशिक्षणासाठीच्या वातावरणाची निर्मिती<br>▶ जल समृद्ध , स्वच्छ गाव व शाश्वत सेवा प्रदानाचे मुख्य घटक<br>▶ पाणी पुरवठा सुविधा कार्यान्वयन चाचणी – संकल्पना व कार्यपद्धत<br>▶ पाणी पुरवठा योजना हस्तांतरणाची प्रक्रिया शाश्वत स्त्रोत<br>▶ पाणी गुणवत्ता सनियंत्रण व व्यवस्थापन<br>▶ पाणी पुरवठा सुविधांची संचालन, देखभाल आणि दुरुस्ती<br>▶ स्वच्छ गाव निर्मितीसाठीची कार्यपद्धत<br>▶ शासकीय योजनांचे अभिसरण<br>▶ पाणी व स्वच्छतेची शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी समुदाय संगठन प्रक्रिया<br>▶ प्रक्षेत्र भेटीची तयारी व प्रक्षेत्र भेट<br>▶ प्रक्षेत्र भेटीसंबंधी अनुभव कथन व गटकार्य<br>▶ नेतृत्व विकास<br>▶ पाणी पुरवठा सुविधांची शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी कृती आराखड्याची निर्मिती |
| प्रशिक्षण विषय पत्रिका | सोबत जोडली आहे |

# ३ प्रशिक्षणाची रूपरेषा

| | सत्राचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| **दिवस पहिला** | | |
| १.१ | **प्रशिक्षणासाठीच्या वातावरणाची निर्मिती** | **भाग १**: प्रस्तावना व प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन<br>**भाग २**: प्रशिक्षणार्थींचा परिचय<br>**भाग ३**: अपेक्षा पत्र<br>**भाग ४**: प्रशिक्षण पूर्व प्रश्नावली<br>**भाग ५**: प्रशिक्षणादरम्यानच्या सत्रांचा तपशील |
| १.२ | **जल समृद्ध , स्वच्छ गाव व शाश्वत सेवा प्रदानाचे मुख्य घटक** | **भाग १**: मानवी जीवनात पाणी व स्वच्छतेचे महत्व<br>**भाग २**: शाश्वत विकासाचे ध्येय व संकल्पना दृष्टीकोन<br>**भाग ३**: जल समृद्ध व स्वच्छ गावाचे घटक<br>**भाग ४**: पाणी व स्वच्छता सुविधांची शाश्वत सेवा |
| १.३ | **पाणी पुरवठा सुविधा कार्यान्वयन चाचणी – संकल्पना व कार्यपद्धत** | **भाग १**: योजनेच्या कार्यान्वयन चाचणीची संकल्पना व महत्व<br>**भाग २**: योजनेच्या कार्यान्वयन चाचणीची कार्यपद्धत<br>**भाग ३**: कार्यान्वयन चाचणी दरम्यान कंत्राटदाराची भूमिका |
| १.४ | **पाणी पुरवठा योजना हस्तांतरणाची प्रक्रिया** | **भाग १**: योजना हस्तांतरणाची प्रक्रिया<br>**भाग २**: हस्तांतरण प्रक्रीयेत विविध भागधारकांच्या भूमिका व जबाबदा-या<br>**भाग ३**: योजना पूर्णत्व अहवाल निर्मितीची कार्यपद्धत |
| १.५ | **शाश्वत स्त्रोत** | **भाग १**: महाराष्ट्र राज्यातील जल संकट<br>**भाग २**: जल व्यवस्थापन संकल्पना, आव्हाने व गरज<br>**भाग ३**: पाण्याचा ताळेबंद<br>**भाग ४**: पिण्याच्या पाण्याची मागणी आणि पुरवठ्याचे व्यवस्थापन<br>**भाग ५**: निधीचे स्त्रोत |
| **दिवस दुसरा** | | |
| २.१ | **पाणी गुणवत्ता सनियंत्रण व व्यवस्थापन** | **भाग १**: सुरक्षित पाण्याचे महत्व<br>**भाग २**: पाणी गुणवत्ता परीक्षण, सनियंत्रण आणि व्यवस्थापनसंबंधीच्या तरतुदी<br>**भाग ३**: पाण्याच्या गुणवत्तेची चाचणी आणि स्वच्छता |

| | | |
|---|---|---|
| | | सर्वेक्षणासाठीचे उपक्रमे<br>**भाग ४:** सुरक्षित पाणी पुरवठ्यासाठीच्या उपाययोजना |
| २.२ | **पाणी पुरवठा सुविधांची संचालन, देखभाल आणि दुरुस्ती** | **भाग १:** पाणी पुरवठा सुविधांच्या संचालन आणि देखभाल दुरुस्तीची संकल्पना आणि महत्त्व<br>**भाग २:** सुविधांच्या संचालन आणि देखभाल दुरुस्तीसाठी जल जीवन मिशन मधील तरतुदी<br>**भाग ३:** पाणी पुरवठा सुविधांचे तांत्रिक व्यवस्थापन<br>**भाग ४:** पाणी पुरवठा सुविधांचे आर्थिक व्यवस्थापन<br>**भाग ५:** पाणी पुरवठा सुविधांचे संस्थात्मक व्यवस्थापन |
| २.३ | **स्वच्छ गाव निर्मितीची कार्यपद्धत** | **भाग १:** हागणदारीमुक्तीची शाश्वतता<br>**भाग २:** सांडपाणी व्यवस्थापन<br>**भाग ३:** घनकचरा व्यवस्थापन<br>**भाग ४:** मैला गाळ व्यवस्थापन |
| २.४ | **प्रक्षेत्र भेटीची तयारी** | **भाग १:** प्रक्षेत्र भेटीचा उद्देश व प्रक्षेत्र भेटीची तयारी<br>**भाग २:** भेटी दरम्यानच्या प्रशिक्षणार्थींच्या भूमिका व जबाबदा-या |
| | **दिवस तिसरा** | |
| ३.१ | **प्रक्षेत्र भेटीसंबंधी अनुभव कथन व गटकार्य** | **भाग १:** प्रक्षेत्र भेटीचे अनुभव कथन |
| ३.२ | **शासकीय योजनांचे अभिसरण** | **भाग १:** पाणी पुरवठा व स्वच्छता सबंधित कामांसाठी उपलब्ध निधीचे स्रोत<br>**भाग २:** पाणी पुरवठा व स्वच्छता कामांसाठी १५ वा वित्त आयोगातील तरतुदी<br>**भाग ३:** प्रस्तावित कामांचा ग्राम विकास आराखड्यात अंतर्भाव करण्याची कार्यपद्धत |
| ३.३ | **पाणी व स्वच्छतेची शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी समुदाय संगठन प्रक्रिया** | **भाग१:** गाव विकासात समुदाय संगठन आणि लोकसहभागाचे महत्व<br>**भाग २ :** समुदाय संगठन प्रक्रिया<br>**भाग ३:** जल समृद्ध गाव बनविण्यासाठीच्या पायऱ्या |
| ३.४ | **नेतृत्व विकास** | **भाग १:** नेतृत्व विकासाची संकल्पना व नेतृत्वाचे महत्व आणि गरज<br>**भाग २:** चांगल्या नेतृत्वाची तत्वे व त्यासाठी आवश्यक असलेली गुणवैशिष्टये<br>**भाग ३:** नेतृत्व शैलीचे प्रकार<br>**भाग ४:** नेतृत्व विकासासाठी आवश्यक कौशल्य व ती विकसित करण्याची कार्यपध्दत |

| | | |
|---|---|---|
| ३.५ | **पाणी पुरवठा सुविधांची शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी कृती आराखड्याची निवड** | **भाग १**: कृती आराखडा निर्मिती व सादरीकरण |
| ३.६ | **प्रशिक्षणाचा समारोप** | **भाग १**: प्रशिक्षण कालावधीतील मुद्यांचा आढावा<br>**भाग २**: प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण सत्रासंबंधीचा अभिप्राय<br>**भाग ३**: प्रशिक्षण पश्चात प्रश्नावली व समारोप |

# ४ प्रशिक्षणाचे वेळापत्रक

कालावधी : __/__/______ प्रशिक्षण स्थळ : ____________

| सत्र क्र. | कालावधी | सत्राचे नाव | साधनव्यक्ती |
|---|---|---|---|
| **दिवस पहिला** | | | |
| १.१ | स. ०९.३० ते स.१०.४५ | प्रशिक्षणासाठीच्या वातावरणाची निर्मिती | |
| १.२ | स.१०.४५ ते स. ११.४५ | जल समृद्ध , स्वच्छ गाव व शाश्वत सेवा प्रदानाचे मुख्य घटक | |
| | **विश्रांती व चहा स.११.४५ ते दु.१२.००** | | |
| १.३ | स. १२.०० ते दु.०१.०० | पाणी पुरवठा सुविधा कार्यान्वयन चाचणी – संकल्पना व कार्यपद्धत | |
| | **जेवण – दु.०१.०० ते दु. ०२.००** | | |
| १.४ | दु. ०२.०० ते दु. ०३.३० | पाणी पुरवठा योजना हस्तांतरणाची प्रक्रिया | |
| | **विश्रांती व चहा - दु.०३.३० ते दु.०३.४५** | | |
| १.५ | दु. ०३.४५ ते ०५.३० | शाश्वत स्त्रोत | |
| **दिवस दुसरा** | | | |
| २.१ | स.०९.३० ते स.१०.३० | पाणी गुणवत्ता सनियंत्रण व व्यवस्थापन | |
| | **विश्रांती व चहा स.१०.३० ते स. १०.४५** | | |
| २.२ | स.१०.४५ ते दु.१२.०० | पाणी पुरवठा सुविधांची संचालन, देखभाल आणि दुरुस्ती | |
| २.३ | दु.१२.०० ते दु.०१.०० | स्वच्छ गाव निर्मितीची कार्यपद्धत | |
| २.४ | दु.०१.०० ते दु.०१.३० | प्रक्षेत्र भेटीची तयारी | |
| | **जेवण दु. ०१.३० ते दु.०२.३०** | | |
| २.५ | दु.०२.३० ते सा.०६.०० | प्रक्षेत्र भेट | |
| **दिवस तिसरा** | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३.१ | ०९.३० ते १०.३० | प्रक्षेत्र भेटीसंबंधी अनुभव कथन व गटकार्य | |
| | **विश्रांती व चहा स.१०.३० ते स.१०.४५** | | |
| ३.२ | स.१०.४५ ते दु.१२.०० | शासकीय योजनांचे अभिसरण | |
| ३.३ | दु.१२.०० ते दु.०१.०० | पाणी व स्वच्छतेची शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी समुदाय संगठन प्रक्रिया | |
| | **जेवण – दु.०१.०० ते दु. ०२.००** | | |
| ३.४ | दु.०२.०० ते दु.०३.३० | नेतृत्व विकास | |
| | **विश्रांती व चहा - दु.०३.३० ते दु.०३.४५** | | |
| ३.५ | दु.३.४५ ते दु. ०४.३० | पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधांची शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी कृती आराखड्याची निर्मिती | |
| ३.६ | दु.०४.३० ते सा.०५.०० | प्रशिक्षणाचा समारोप | |

# ५ सत्र सुलभिकरणाची प्रक्रिया

## दिवस पहिला

### सत्र क्र. १.१ प्रशिक्षणासाठीच्या वातावरणाची निर्मिती

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | १. प्रशिक्षणाचे औपचारीकरीत्या उद्घाटन करणे<br>२. प्रशिक्षणार्थींची एकमेकांना ओळख करून देवून त्यांच्यातील आपुलकीची भावना वाढीस लावणे .<br>३. प्रशिक्षणासाठी एक मोकळे वातावरण तयार करणे<br>४. प्रशिक्षणाचा मूळ उद्देश आणि प्रशिक्षणादरम्यानच्या सत्रांची माहिती देणे<br>५. प्रशिक्षण विषयाशी संबंधित प्रशिक्षणार्थींना असलेली समज दृढ करणे |
| **सत्राचा कालावधी** | ७५ मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • खेळ<br>• कृतीकार्य<br>• खुला संवाद<br>• व्याख्यान |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १:** प्रस्तावना व प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन<br>**भाग २:** प्रशिक्षणार्थींचा परिचय<br>**भाग ३:** अपेक्षा पत्र<br>**भाग ४:** प्रशिक्षणपूर्व प्रश्नावली<br>**भाग ५:** प्रशिक्षणादरम्यानच्या सत्रांचा तपशील |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ सादरीकरण<br>▶ A४ आकाराचे कागद<br>▶ स्केच पेन<br>▶ मार्कर |

### सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| २० मिनिटे | भाग १: प्रस्तावना व प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन<br><br>१. सर्वप्रथम जिल्हा समन्वयक/प्रशिक्षकाने कार्यक्रमासाठी उपस्थित राहिलेल्या पाहुण्यांचे व प्रशिक्षणार्थींचे स्वागत करावे.<br><br>२. यानंतर आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणासंबंधी थोडक्यात प्रस्तावना करावी. प्रस्तावने नंतर उपस्थित मान्यवरांना दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्याची विनंती करावी. |

| | |
|---|---|
| | ३. उपस्थित मान्यवरांना प्रशिक्षणासंबंधी आपले मनोगत व्यक्त करण्याची विनंती करावी. मनोगतानंतर  कार्यक्रमाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर करावे. |
| **२० मिनिटे** | भाग २: प्रशिक्षणार्थींचा परिचय<br>१. सर्वप्रथम प्रशिक्षणार्थींचे  टाळयांच्या गडगडाटात स्वागत करावे व प्रशिक्षण सुरु करण्यापूर्वी प्रशिक्षणार्थींची एकमेंकाशी ओळख होण्याचे महत्व समजून सांगावे.<br>२. यानंतर सर्व प्रशिक्षणार्थींना गोलाकार उभा राहण्याची विनंती करावी.<br>३. रकाना  क्र. १ मध्ये दिल्यानुसार खेळाच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींची एकमेकांशी ओळख करून द्यावी. |
| **१५ मिनिटे** | भाग ३: प्रशिक्षणाचा उद्देश व अपेक्षा पत्र<br>१. प्रशिक्षणार्थींचा परिचय झाल्यानंतर वर्गात मोकळेपणा आलेला असेल याचा आधार घेवून प्रशिक्षणाचा उद्देश समजून सांगावा.<br>२. प्रशिक्षणाचा विषय आणि उद्देश लक्षात घेवून प्रशिक्षणार्थींनी त्यांच्या जवळ असलेल्या अनुभवाची देवाण- घेवाण करण्याची विनंती करावी.<br>३. गावात निर्माण झालेल्या पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधेतून ग्रामस्थांना शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी प्रशिक्षणातून त्यांच्या असलेल्या अपेक्षा समजून घ्याव्यात.<br>४. अपेक्षा समजून घेण्यासाठी प्रत्येक प्रशिक्षणार्थींना A८ आकाराचा कागद द्यावा व सदर अपेक्षांची दिलेल्या कागदामध्ये नोंद करून घेण्यास सांगावी.<br>५. प्रत्येक प्रशिक्षणार्थींनी अपेक्षांची नोंद केल्याची खात्री करून सदर कागद त्यांच्याकडून प्राप्त करून घ्यावा. |
| **१० मिनिटे** | भाग ४ : प्रशिक्षणादरम्यानच्या सत्रांचा तपशील<br>१. सत्राच्या पुढील भागात तीन दिवसाच्या प्रशिक्षण कालावधीत नेमक्याने चर्चिल्या जाणा-या विषयावर थोडक्यात चर्चा करावी व प्रशिक्षणादरम्यान त्यांच्या अपेक्षांची पूर्तता केली जाण्याची खात्री द्यावी. |
| **१० मिनिटे** | भाग ५ : प्रशिक्षण पूर्व प्रश्नावली<br>१. यानंतर परिशिष्ट क्र. १ मध्ये जोडण्यात आलेली प्रशिक्षण पूर्व प्रश्नावली प्रशिक्षणार्थींना देवून ती भरण्याची विनंती करावी.<br>२. सदर प्रश्नावली ही प्रशिक्षणाच्या अखेरीस देखील देण्यात येणार असल्याचे सांगावे व या प्रश्नावलीतून समोर येणा-या निष्कर्षातून प्रशिक्षकांच्या विषय सुलभीकरणाचे मुल्यांकन होणार असल्याचे नमूद करावे व सत्राचा समारोप करावा. |

**या सत्राविषयीचे सादरीकरण पाहण्यासाठी वरील QR code स्कॅन करा**

## रकाना क्र. १ सहभागींचा परिचय (खेळ )

सर्वप्रथम विविध फळांच्या नावाच्या प्रत्येकी दोन याप्रमाणे प्रशिक्षणार्थीच्या संख्येच्या प्रमाणात चिठ्ठ्या करून घ्या. उदा. आंबा, सफरचंद, चिक्कू इ. यानंतर बाऊल मध्ये चिठ्ठ्या एकत्र करा. प्रत्येक प्रशिक्षणार्थींना बाऊल मधील एक चिठ्ठी उचलण्यास सांगा. सर्वांना चिठ्ठ्या मिळाल्याची खात्री करा. आता प्रत्येक प्रशिक्षणार्थीला आपल्या फळाच्या नावाची चिठ्ठी असलेल्या दुसऱ्या प्रतिनिधीस शोधण्यास सांगा. सर्व प्रतिनिधींना आपला साथीदार मिळाला असल्याची खात्री करा.

यानंतर प्रत्येक गटास आपल्या साथीदाराची ओळख करून घेण्याची विनंती करा. ओळख करून घेण्यासाठी नाव, पद, आवड इ. बाबीवर चर्चा करण्यास सांगा. ओळख करून झाल्यानंतर प्रत्येक जोडीस एकमेकांची ओळख करून देण्यास सांगा.

## सत्र क्र. १.२ जल समृद्ध , स्वच्छ  गाव व शाश्वत सेवा प्रदानाचे मुख्य घटक

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | १. शाश्वत विकासाची ध्येय व ती गाठण्यासाठी शासनाने सुरु केलेल्या संकल्पनात्मक दृष्टीकोनाची माहिती देणे.<br>२. जल समृद्ध, स्वच्छ गावाची संकल्पना व महत्व समजून सांगणे<br>३. पाणी व स्वच्छतेच्या शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी  कोणकोणत्या घटकांचा विचार करावा लागेल या बाबत स्पष्टता आणणे. |
| **सत्राचा कालावधी** | ६० मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • खेळ<br>• खुलासंवाद व प्रश्नोत्तरे<br>• चित्रफितीचे सादरीकरण<br>• कृती कार्य<br>• व्याख्यान |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १:** मानवी जीवनात पाणी व स्वच्छतेचे महत्व<br>**भाग २:** शाश्वत विकासाचे ध्येय, संकल्पना व दृष्टीकोन<br>**भाग ३:** जल समृद्ध व स्वच्छ गावाचे घटक<br>**भाग ४:** पाणी व स्वच्छता सुविधांची शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी गृहीत धरावयाचे मुख्य घटक |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ सादरीकरण<br>▶ चार्ट पेपर<br>▶ स्केच पेन<br>▶ मार्कर<br>▶ फलक |

### सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| **१० मिनिटे** | <u>भाग १ मानवी जीवनात पाणी व स्वच्छतेचे महत्व</u><br>१. सत्राची  सुरुवात तक्ता क्र.१ मध्ये दिलेल्या **‘माझ्या स्वप्नातील गाव’** या संकल्पनेचे वाचन करावे. वाचन झाल्यानंतर प्रशिक्षणार्थींच्या  प्रतिक्रिया घ्याव्यात आणि खाली दोन प्रश्न विचारून या बाबत त्यांचे मत जाणून घ्यावे.<br>✚ सद्यस्थितीत  ‘माझ्या स्वप्नातील गाव’ याप्रमाणे  तुमचे गाव बनवण्यात नेमकी कोण कोणती आव्हाने आहेत ?<br>✚ तुमचं गाव माझ्या स्वप्नातील गाव प्रमाणे झाले तर तुमच्या गावास नेमका काय फायद होईल असे तुम्हाला वाटते?.<br>२. प्रशिक्षणार्थींनी मांडलेले मुद्दे चार्ट पेपर वर लिहून काढून भिंतीवर चिकटवावे  व आपले “गाव माझ्या स्वप्नातील गाव” कसे बनवावे या बाबत आपण आता चर्चा करणार आहोत असे सूचित करावे. |

| | |
|---|---|
| १५मिनिटे | **भाग २ शाश्वत विकासाचे ध्येय व संकल्पना दृष्टीकोन**<br><br>१. सत्राच्या या भागात शाश्वत विकासाची १७ ध्येये ढोबळमानाने समजून सांगावेत. केंद्र शासनाच्या पंचायत राज विभागाने ग्रामपंचायत स्तरावर लोकसहभागातून ही शाश्वत विकासाची ध्येये स्थानिक नियोजनाच्या माध्यमातून साध्य करण्याचा संकल्प केला असल्याचे स्पष्ट करावे.<br>२. भारतातील सुमारे ७०% लोकसंख्या ही खेड्यामध्ये राहत असल्याने प्रस्तुत शाश्वत विकासाची ध्येये साध्य करण्यासाठी त्यांचे स्थानिकीकरण करून शासनाने एकूण नऊ संकल्पनात्मक दृष्टीकोनाची अंमलबजावणी सुरु केल्याचे नमूद करावे.<br>३. या नऊ संकल्पनेत १७ विकासाची ध्येये सामावलेली असून या ध्येयाबरोबर विविध मंत्रालयाबरोबर आलेखन केल्याचे स्पष्ट करावे.<br>४. नऊ संकल्पनेवर थोडक्यात चर्चा करून संकल्पना क्र. ४ व ५ म्हणजेच जल समृध्द, स्वच्छ व हरीत गाव हे ध्येय गाठण्याकरिता योग्य दिशा निश्चित करण्यासाठी सदर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आल्याचे नमूद करावे. |
| २५ मिनिटे | **भाग ३ जल समृद्ध व स्वच्छ गावाचे घटक**<br><br>१. प्रशिक्षणार्थींना सोबत दिलेल्या लिंकवरील चित्रफित दाखवावी (लिंक – जल समृद्ध गाव ) व खालील विषयावर खुली चर्चा करावी.<br>- गावात नेमक्या कोणत्या समस्या दिसून आल्या?<br>- समस्यावर मात करण्यासाठी गावाने नेमके काय केले?<br>- कामात लोकसहभाग का व कसा मिळाला?<br>- गावाने एकत्र येवून नेमकी कोणती कामे केली?<br>- आपण चिंचोली प्रमाणे आपले गाव करू शकतो का? जर उत्तर हो असेल तर तुम्ही पाणी आणि स्वच्छतेच्या कोण कोणत्या घटकावर काम कराल?<br>२. वरील मुद्द्यावर चर्चा करून प्रशिक्षणार्थींना भविष्यात जल समृध्द व स्वच्छ गाव बनविण्यासाठी नेमक्याने कोण-कोणत्या घटकावर काम करावे लागेल या बाबत थोडक्यात स्पष्टता आणावी. जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन टप्पा II या दोन्ही कार्यक्रमाच्या माध्यमातून आपले गाव जल समृद्ध व स्वच्छ गाव बनविण्यासाठी एक संधी असल्याचे स्पष्ट करा. |

<table>
<tr><td>१० मिनिटे</td><td><u>भाग ४ : पाणी व स्वच्छता सुविधांची शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी गृहीत धरावयाचे मुख्य घटक</u><br>१. जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन २.० हे भांडवली गुंतवणुकीतून केवळ भौतिक सुविधा निर्माण करण्याचे कार्यक्रम नाहीत, तर या निर्माण होणाऱ्या सुविधेतून शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी गावपातळीवर एक सक्षम व्यवस्था निर्माण करण्याचा आणि तसेच ग्रामस्थांमध्ये योजनेप्रती स्वमालकीची भावना निर्माण करण्याचा एक नाविन्यपूर्ण उपक्रम असल्याचे स्पष्ट करा.<br>२. जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन अंतर्गत निर्माण होणाऱ्या पाणी पुरवठा आणि स्वच्छतेच्या सुविधांचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर योजना ग्रामपंचायतीस हस्तांतरीत होणार आहेत. योजनांच्या हस्तांतरणा नंतर सदर सुविधेतून गावास शास्वत सेवा प्रदान करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असून यानुषंगाने ग्रामपंचायतीनी सक्षम होण्याची गरज असल्याचे विषद करावे.<br>३. सदर पाणी आणि स्वच्छतेच्या सुविधेतून शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी लक्षात घ्यावयाचे खालील घटक विषद करावेत<br>- पाणी पुरवठा सुविधांची हस्तांतरण प्रक्रिया<br>- स्त्रोत बळकटीकरण व त्याची शाश्वतता<br>- पाणी गुणवत्ता व्यवस्थापन<br>- पाणी पुरवठा सुविधांची संचालन, देखभाल व दुरुस्ती<br>४. सत्राच्या पुढील भागात वरील घटकांविषयी प्रशिक्षणादरम्यान सविस्तर चर्चा करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करा.<br>सत्रासाबंधी प्रशिक्षणार्थीच्या काही शंका असल्यास त्या दूर करून सत्राचा समारोप करावा.</td></tr>
</table>

## तक्ता क्र.१ माझ्या स्वप्नातील गाव

एक दिवस विविधतेने नटलेलं असेल माझ गाव. समानता, बंधुभाव, प्रेम, दया, निस्वार्थ इ. माझ्या गावाचा भक्कम पाया असेल . नैसर्गिकतेने नटलेले माझ गाव डोंगरदऱ्या, नदी, नाले, झाडे, जंगल यांनी सदैव बहरलेले असेल. गावात रस्त्याच्या बाजूला, प्रत्येक गल्लीत झाड -झाडोरा असेल आणि माझ गाव फुलांच्या सुगंधाने दरवळत असेल. गावाच्या विकास कामात प्रत्येकाचा हात असेल आणि अशावेळी राजकारण करण्याचा कुणाचा डोक्यात विचारही नसेल.

गावात पडणाऱ्या प्रत्येक पावसाचा थेंब नदी, नाल्या, ओढ्यात फक्त वाहून न जाता त्याला जमिनीत मुरविण्यासाठी जल व मृद संधारणाची कामे गावकऱ्यांनी केलेली असतील. माझ्या गावातील प्रत्येक पाण्याचा स्त्रोत पाण्याने तुडुंब भरलेला असेल. माझ्या गावातील आई,बहिण यांच्या डोक्यावरील पाण्याची घागर आता उतरलेली असेल. घरधन्याच्या खांद्याला खांदा लावून शेतात कष्ट करण्यासाठी तिच्याकडे पुरेसा वेळ देखील असेल. कारण माझ्या गावातील प्रत्येक कुटुंबाना आता नळाने पाणी देण्याचे नियोजन माझ्या गावाने केलेले असेल. पाणी पुरवठ्याच्या ठरलेल्या वेळी नळाला पाणी आले असेल आणि माझ्या गावातील मुलीना आता पाण्यासाठी शाळा सोडण्याची गरज सुद्धा नसेल. पाण्याचं महत्व प्रत्येक व्यक्तीला कळालेलं असेल, त्यामुळे गरज तितकेच पाणी आता प्रत्येक घरात असेल. गावातील प्रत्येक कुटुंब होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे समाधानी असेल आणि वेळच्यावेळी पाणीपट्टी भरण्यास तत्पर ही असेल.

पाणी अडवा, पाणी जिरवा याचबरोबर बहुमुल्य पाण्याच्या मर्यादित वापरासाठी लघुसिंचन पद्धतीचा अवलंब आणि त्याच बरोबर नगदी पिकाऐवजी कमी पाणी लागणारी पिके घेण्याचा संकल्प माझ्या गावातील प्रत्येक शेतकऱ्याने केलेला असेल. सेंद्रिय आधारित शेतीचा ध्यास घेवून रासायनिक शेतीला अटकाव केलेला असेल. मानव निर्मित रासायनिक प्रदूषणाला आळा बसून माझ्या गावात शुद्ध पाण्याचा पुरवठा देखील असेल.

माझ्या गावातील प्रत्येक कुटुंबाच्या घरी आता आरोग्य नांदेल, कारण प्रत्येक घरात, सार्वजनिक ठिकाणी , शाळा आणि अंगणवाडी अशा सर्व ठिकाणी शौचालयाची व्यवस्था असेल. शौचालयाचा वापर प्रत्येकजण करीत असेल आणि माझा गाव शाश्वतरित्या हागंणदारीमुक्त झालेलं असेल. सांडपाणी, मैला गाळ व्यवस्थापन आणि घनकच-याच्या माझ्या गावात सुविधा असतील. या निर्माण झालेल्या सुविधेप्रती ग्रामस्थामध्ये स्वमालकीची भावना असेल. सांडपाणी आणि घनकच-याचे व्यवस्थापन घरच्या घरीच करण्याचा प्रयत्न आता केला जात असेल. मी प्लास्टिक वापरणार नाही आणि पर्यावरणाचा -हास करणार नाही अशी प्रत्येक व्यक्तीने शपथ घेतलेली असेल. गावात जनावरांचा गोठा आणि गोठ्यातून बाहेर पडणाऱ्या शेणाचे योग्य व्यवस्थापन केलेलं असेल. यातून खत आणि उर्जा निर्मितीचा संकल्प आणि त्याची अंमलबजावणी देखील केलेली असेल.

याचबरोबर माझ गाव भौतिक सुविधांनी परिपूर्ण असेल. शाळा, अंगणवाडी, मैदान, संकुले, व्यायामशाळा, बँक, वाचनालय, रस्ते, सोलर पथदिवे, समाज मंदिर इ. ते सज्ज असेल. प्रत्येक सुविधांचा वापर आणि देखभाल दुरुस्तीसाठी माझ्या गावातील प्रत्येक सदस्य कटिबद्ध असेल. गावच्या शासकीय शाळेत मुलीसोबत मुलेदेखील शिकतील, संतांच्या पुण्याईचे आणि छत्रपतींच्या पराक्रमांचे धडे गिरवतील.

असे माझे गाव होईल का हो एकदातरी, की इथल्या पारावर मांडीला मांडी लावून बसून फक्त गावाच्या विकासाचा विचार करणारी ग्रामस्थ मंडळी असतील. एक दिवस असाही येईल कि, तालुक्याच्या, जिल्ह्याच्या, राज्याच्या इतकेच नव्हे तर देशाच्या नकाशात माझ्या गावाचा नाव कोरलं जाईल आणि माझ्या गावाच्या प्रत्येक नागरिकास माझ्या गावाचा अभिमान असेल.

अस असेल माझ्या स्वप्नातील सुजल, समृध्द आणि संपन्न गाव ……



या सत्राविषयीचे सादरीकरण पाहण्यासाठी वरील QR code स्कॅन करा

## सत्र क्र. १.३ पाणी पुरवठा सुविधा कार्यान्वयन चाचणी – संकल्पना व कार्यपद्धत

| | | |
|---|---|---|
| १ | **सत्राचा उद्देश** | १. योजनेच्या कार्यान्वयन चाचणीची संकल्पना व महत्व समजून सांगणे<br>२. योजनेच्या कार्यान्वयन चाचणीची कार्यवाही विषद करणे<br>३. कार्यान्वयन चाचणी दरम्यान कंत्राटदाराची भूमिका स्पष्ट करणे |
| २ | **सत्राचा कालावधी** | ६० मिनिटे |
| ३ | **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • खेळ<br>• चित्रफितीचे सादरीकरण<br>• खुला संवाद<br>• कल्पनाविस्फोट<br>• व्याख्यान |
| ४ | **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १:** योजनेच्या कार्यान्वयन चाचणीची संकल्पना व महत्व<br>**भाग २:** योजनेच्या कार्यान्वयन चाचणी दरम्यान करावयाची कार्यवाही व कंत्राटदाराची भूमिका |
| ५ | **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ सादरीकरण<br>▶ मार्कर |

## सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| ३० मिनटे | <u>भाग १: योजनेच्या कार्यान्वयन चाचणीची संकल्पना व महत्व</u><br><br>१. सत्राच्या सुरूवातीस सत्रादरम्यान चर्चा करावयाचे मुददे अधोरेखीत करावे.<br>२. सादरीकरणाच्या आधारे योजनेच्या कार्यान्वयन चाचणीची व्याख्या समजून सांगा.<br>३. यानंतर खालील मुद्द्यांचे विश्लेषण करून योजनेच्या कार्यान्वयन चाचणीचे महत्व विषद करा.<br>✚ कार्यान्वयन चाचणीमुळे अंदाजपत्रकानुसार प्रत्येक उपांगांची कामे दर्जेदारपणे झाली असल्याची खात्री होते.<br>✚ योजना सुरळीत चालण्यात काही त्रुटी आढळल्यास त्या दूर करण्यास मदत होते<br>✚ निर्माण झालेल्या पाणी पुरवठा सुविधेतून शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी ग्रामस्तरावरील विविध भागधारकांची क्षमता बांधणी करण्यास मदत होते. |
| ३० मिनटे | <u>भाग २ व भाग ३: योजनेच्या कार्यान्वयन चाचणीची कार्यवाही व कार्यान्वयन चाचणी दरम्यान कंत्राटदाराची भूमिका</u><br><br>१. या भागात तक्ता क्र. २ मध्ये दिल्यानुसार पाणी पुरवठा योजना पूर्ण झालेल्या एका गावाच्या यशोगाथेचे वाचन करावे.<br>२. यशोगाथेचे वाचन करून त्या खाली दिलेले प्रश्न विचारावेत. |

| | |
|---|---|
| | ३. प्रशिक्षणार्थीकडून प्राप्त झालेल्या मुद्द्यांच्या आणि सादरीकरणाच्या आधारे योजना कार्यान्वयन चाचणी आणि चाचणी दरम्यान कंत्राटदार आणि ग्रामपंचायतीची भूमिका स्पष्ट करावी व सत्राचा समारोप करावा. |

**या सत्राविषयीचे सादरीकरण पाहण्यासाठी वरील QR code स्कॅन करा**

## तक्ता क्र.२ हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण केलेल्या अमदापूर गावाची यशोगाथा

झारखंड राज्यातील हजारीबाग जिल्ह्यामधील रंगाटोली नावाचा वसलेलं एक छोटस गाव. गावाची पाणी पुरवठा योजना नसल्याने हातपंप, विहिरी खाजगी बोरवेल इतकेच नव्हे तर अगदी मिळेल तिथून पाणी आणायचं आणि आपली रोजची गरज भागवायची हे गावातील कुटुंबांच्या पाचवीला पुजलेलं होतं.

पाणी म्हटलं कि, महिलांचा विषय आला. मग काय घरातील महिला,शाळकरी मुली यांचा जास्तीत जास्त वेळ पाणी आणण्यातच जात होता. यामुळं मुलींच्या शाळा बुडत होत्या, महिलांना पाठीचा, मणक्याचा पोटाचा त्रास दिवसेंदिवस वाढतच होता. एके दिवशी गावात पाणी पुरवठा विभागाचे इंजिनिअर साहेबांनी गावास भेट दिली. गावातील पाण्याची दुर्भिक्ष स्थिती पाहून त्यांनी गावास जल जीवन मिशन मध्ये भाग घेण्यास सांगितला. गावातील लोकांनी सहभागासाठी उत्साह दर्शविला.

गावाची योजनेत निवड झाली. सर्व गावकऱ्यानी मिळून गावच्या पाणी पुरवठा योजनेची निश्चिती केली. सर्व्हेचे काम पूर्ण झाले. अंदाजपत्रकास ग्रामसभेची मंजुरी मिळाली आणि बघता बघता योजेनेच्या कामास सुरुवात देखील झाली. योजना गावची आणि त्याच्या पुर्णत्वानंतर गावास पुढील ३० वर्षे गावास चालवायची याची जाणीव गावक-यांना होती. यासाठी कामाच्या ठिकाणी ४-५ ग्रामस्थांचा गट केला व कामाच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी त्यांना दिली. कंत्राटदाराने देखील प्रत्येक उपांगांचे दर्जेदार काम केले. ठरलेल्या काळात गावाची योजना पूर्ण झाली आता प्रत्येक घरात नळाने पाणी जाणार होते.

योजना पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराने ग्रामस्थांची बैठक बोलविली व झालेल्या कामांचा आढावा दिला. याचबरोबर त्याने कार्यान्वयन चाचणीच्या प्रक्रियेची सविस्तर माहिती त्यांना दिली. कार्यान्वयन चाचणी दरम्यान ग्रामपंचायतीने निवडलेल्या तांत्रिक व्यक्तींना प्रशिक्षण दिले, पंप कसा सुरु कसा करायचा?, त्याच्या नोंदी कशा ठेवायच्या?, पाण्याची टाकी साफ कधी व कशी करायची?, पाणी कसे सोडायचे?, पाण्याचे निर्जंतुकीकरण कसे करायचे?, लिकेज दुरुस्ती, आणि प्रत्येक कामांचे दस्ताऐवजीकारणाची कार्यपद्धती व्यवस्थित समजून सांगितली.

तसेच पाणीपट्टी अंदाजपत्रक तयार करण्यासाठी, पाणीपट्टी वसूली करण्यासाठीची कार्यपद्धत, दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य, नळ जोडणी देण्याची कार्यपद्धत देखील ग्रामपंचायत व पाणी पुरवठा स्वच्छ समिती सदस्यांना सविस्तर समजावून सांगितली. ग्रामपंचायतीने चाचणीच्या काळात कंत्राटदाराच्या कामाचे सनियंत्रण केले व आवश्यकतेनुसार त्यांना मदत देखील केली.

बघता-बघता कार्यान्वयन चाचणीचा कालावधी संपला आणि ग्रामसभेचे थाटामाटात आयोजन करून योजना आपल्या ताब्यात घेतली.

**या यशोगाथेच्या वाचनानंतर प्रशिक्षणार्थींना खालील प्रश्न विचारावेत.**

1. पाण्यासंबंधी गावाच्या समस्या काय होत्या? त्याचा परिणाम कुटुंबावर काय झाला?
2. पाणी पुरवठा योजनेच्या निश्चितीमध्ये गावाची भूमिका काय होती?
3. कार्यान्वयन चाचणी प्रभावी होण्यासाठी कंत्राटदाराने काय प्रक्रिया केली?
4. कार्यान्वयन चाचणी दरम्यान कंत्राटदार, ग्रामपंचायत आणि पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची भूमिका काय होती?
5. तुमच्या गावात योजनेच्या कार्यान्वयन चाचणी दरम्यान होत असलेल्या कामांची कशी खात्री कराल?

## सत्र क्र. १.४ पाणी पुरवठा योजना हस्तांतरणाची प्रक्रिया

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | १. योजना हस्तांतरणाची प्रक्रिया समजावी<br>२. योजनाफेरी दरम्यान ग्राम पंचायत आणि पाणी पुरवठा समितीची भूमिका कळावी<br>३. योजना पूर्णत्व अहवाल निर्मितीची कार्यपद्धत कळावी<br>४. हर घर जल घोषित करण्याची कार्यपद्धत कळावी |
| **सत्राचा कालावधी** | ९० मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • खेळ<br>• चित्रफितीचे सादरीकरण<br>• खुला संवाद<br>• व्याख्यान |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १**: योजना हस्तांतरणाची प्रक्रिया<br>**भाग २**: योजनाफेरी<br>**भाग ३:** योजना पूर्णत्व अहवाल निर्मितीची कार्यपद्धत<br>**भाग ४:** हर घर जल घोषित करण्याची कार्य पद्धत<br>**भाग ५**: हस्तांतरण प्रक्रीयेत विविध भागधारकांच्या भूमिका व जबाबदा-या |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ सादरीकरण<br>▶ स्केच पेन<br>▶ मार्कर<br>▶ छोट्या आकाराच्या चिठ्या<br>▶ फुगे |

## सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| **१० मिनिटे** | <u>**भाग १: योजना हस्तांतरणाची प्रक्रिया**</u><br><br>१. सर्वप्रथम सादरीकरणाच्या माध्यमातून योजना हस्तांतरण प्रक्रियेच्या संकल्पना विषद करावी व हस्तांतरण प्रक्रियेच्या खालील पायऱ्या थोडक्यात समजून सांगाव्यात.<br>• पायरी क्र. १ : योजनाफेरीचे आयोजन<br>• पायरी क्र. २: कार्य पूर्णत्व अहवालाची निर्मिती<br>• पायरी क्र. ३: हर घर जल ची घोषणा |

| | |
|---|---|
| ३० मिनिटे | <u>भाग २: योजनाफेरी</u><br>१. सत्राच्या पुढील भागात योजनाफेरी म्हणजे काय? व फेरीदरम्यान उपांगांच्या पाहणीचे महत्व समजून सांगावे.<br>२. यानंतर तक्ता क्र. ३ मध्ये दिल्यानुसार खेळाच्या माध्यमातून योजनाफेरी दरम्यान उपांगांची पाहणी नेमक्याने कशी करावी याबाबत सादरीकरण आणि तपासणी सूचीच्या माध्यमातून सविस्तर माहिती विषद करावी. |
| १० मिनिटे | <u>भाग ३: योजना पूर्णत्व अहवाल निर्मितीची कार्यपद्धत</u><br>१. सत्राच्या या भागात सादरीकरणाच्या सहाय्याने योजना पूर्णत्व अहवाल तयार करण्याची जबाबदारी व सदर अहवालात समाविष्ट करण्यात आलेले मुद्दे आणि ग्रामपंचायतीने करावयाची पडताळणी याबाबत स्पष्टता आणावी. |
| २० मिनिटे | <u>भाग ४: हर घर जल घोषित करण्याची कार्य पद्धत</u><br>१. सत्राच्या या भागात खालील लिंक वर दिलेली चित्रफित दाखवावी<br>https://www.youtube.com/watch?v=zED9k3IojhM&t=7s<br>२. चित्रफित दाखविल्यानंतर प्रशिक्षणार्थींना खालील प्रश्न विचारावेत<br>- हर घर जल घोषित करण्यापूर्वी ग्रामपंचायतीने कोण कोणत्या बाबींची खात्री करावी?<br>- ग्रामसभेचे आयोजन कुठे व कसे करावे?<br>- ग्रामसभेत कोण- कोणते निर्णय घ्यायचे आहेत?<br>- ग्रामसभेच्या व्हिडीओ मध्ये कोणकोणत्या गोष्टी येणे अभिप्रेत आहे ?<br>- ग्रामसभा झाल्यानंतर App अथवा संकेस्थळावर कोणकोणते दस्तऐवज अपलोड करावयाचे आहेत ?<br>प्रशिक्षणार्थींनी मांडलेले मुद्यावर व काही मुद्दे राहून गेले असतील तर सादरीकरणाच्या सहाय्याने सहभागींना हर घर जल घोषित करण्याची कार्यपद्धत समजून सांगावी.<br>१. |
| २० मिनटे | <u>भाग ५: हस्तांतरण प्रक्रीयेत विविध भागधारकांच्या भूमिका व जबाबदा-या</u><br>सत्राच्या या भागात हस्तांतरण प्रक्रीयेत ग्रामपंचायत आणि पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे सदस्य समजून सांगण्यासाठी तक्ता क्र. ४ मध्ये दिलेल्या खेळाच्या माद्यमातून विषद करावी. |

## तक्ता क्र. ३ योजनाफेरी (खेळ)

१. सर्वप्रथम खाली दिलेली पाणी पुरवठा योजनेच्या उपांगांची चिठ्यावर नावे लिहा.

| | |
|---|---|
| ❖ पाण्याचा स्त्रोत,<br>❖ पंप,<br>❖ पंप गृह,<br>❖ उद्धरण वाहिनी, | ❖ पाण्याची टाकी,<br>❖ वितरण वाहिनी,<br>❖ व्हॉल्व्ह,<br>❖ नळ |

२. खेळ सुरु करण्यापूर्वी दहा फुगे फुगवून घ्या.

३. यानंतर प्रशिक्षणार्थी मधून ५-५ लोकांची निवड करून त्यांचे दोन गट करा

४. गटाच्या निर्मिती नंतर त्यांना आपल्या गटात एकमेकांच्या मागे उभे राहण्यास सांगा.

५. सहभागी सरळ एक रांगेत एका पाठोपाठ उभे राहल्याची खात्री करा. अशारितीने आता सहभागींच्या दोन रांगा तयार होतील.

६. आता प्रत्येक दोन सहभागींच्या मध्ये खालील छायाचित्रात दाखविल्यानुसार फुगे ठेवा व फुग्यांना हात न लावता दोघांच्या मध्ये धरण्यास सांगा.

७. आता लिहिलेल्या चिठ्ठ्या वेगवेगळ्या ठिकाणी त्यांना दिसतील अशा ठेवा. मात्र कोणती चिट्ठी कोठे ठेवली आहे हे त्यांना सांगू नका.

८. यानंतर रांगेत उभे राहिलेल्या गटांना फुगे न पडू देता प्रत्येक चिट्ठी उचलण्यास सांगा. चिट्ठी शोधताना फुगा पडू द्यायचा नाही अशी सूचना करा.



९. चिठ्ठ्या उचलण्याचा क्रम हा वरील उपांगांच्या सारिणीत दिल्यानुसार असेल अशी सूचना करा.

१०.ज्या गटाने जास्त चिठ्ठ्या उचलल्या त्या गटास विजयी घोषित करा.

११.आता चिठ्ठ्यांच्या संख्येच्या प्रमाणात सहभागींना तिथेच थांबण्यास सांगा व प्रत्येक प्रशिक्षणार्थीस वरील सारीणीतील क्रमांकानुसार चिट्ठी वाचण्यास सांगून खालील प्रश्न विचारा.

- ❖ तुमच्या गावात योजनाफेरी दरम्यान सबंधित उपांगांचे काम गुणवत्ता पूर्ण झाले आहे याची खात्री कशी कराल?.
- ❖ उपांगाशी सबंधित कोण कोणती कामे होणे अपेक्षित आहेत?
- ❖ जर चांगल्या गुणवत्तेचे आणि प्रस्तावित कामे झाली नसतील तर तुम्ही काय कराल?

### तक्ता क्र. ४  हस्तांतरण प्रक्रीयेत विविध भागधारकांच्या भूमिका व जबाबदा-या (पॅनेल डिस्कशन)

- सर्वप्रथम खालील नावाच्या चिठ्या सर्वांना दिसतील अशा कार्डशीट वर करून घ्याव्यात

    - ❖ सरपंच
    - ❖ पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्य
    - ❖ अंमलबजावणी सहाय्य संस्था प्रतिनिधी
    - ❖ कंत्राटदार
    - ❖ अभियंता

- यानंतर स्टेज वर ५ खुर्च्या ठेवून खुर्चीच्या खाली लिहिलेल्या चिठ्या ठेवाव्यात
- सर्वप्रथम प्रशिक्षणार्थी मधून ४ प्रतिनिधींची निवड करून त्यांना खुर्चीवर बसण्याची विनंती करावी
- खुर्चीच्या खाली ज्या पदाचे नाव आहे त्यानुसार त्यांनी आपल्या भूमिका मांडण्याची विनंती करावी.
- आता खालील कामे प्रत्येकाला देवून सबंधित प्रतिनिधी पद लक्षात घेवून सदरील कामे पूर्ण करण्यासाठी

    कोणकोणती भूमिका बजावेल या बाबत विचारणा करा.

    - हस्तांतरणासाठी बैठकीचे आयोजन
    - योजनाफेरी
    - हस्तांतरणासाठी आवश्यक बाबींचे दस्तावेजीकरण व प्रमाणपत्रांची जुळवा जुळवा व सादरीकरण
    - गावस्तरावर हस्तांतरण प्रक्रीये विषयी जाणीव जागृती
    - ग्रामसभेचे आयोजन व हस्तांतरण प्रक्रियेस मंजुरी
    - पाणी पुरवठा सुविधेत असलेल्या त्रुट्याची पूर्तता

**या सत्राविषयीचे सादरीकरण पाहण्यासाठी वरील QR code स्कॅन करा**

## सत्र क्र. १.५ शाश्वत स्त्रोत

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | १. गावातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतातून शाश्वत पाणी पुरवठा न होण्यामागील समस्यांची जाणीव करून देणे.<br>२. व्यवस्थापनाची संकल्पना, जल व्यवस्थापनाशी संबंधित महाराष्ट्र राज्यासमोरील आव्हाने आणि जल व्यवस्थापनाची गरज समजून सांगणे.<br>३. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व मागणी समजण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा ताळेबंद तयार करण्याचे महत्व व त्याची कार्यपध्दत समजून सांगणे<br>४. पिण्याच्या पाण्याच्या ताळेबंदातून समोर येणा-या निष्कर्षाधारे शाश्वत पाणी पुरवठा होण्यासाठी पारंपारीक व अपारंपारीक उपचार पद्धतींची माहिती देणे. |
| **सत्राचा कालावधी** | १०५ मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • प्रश्नोत्तरे<br>• फिश बाऊल गेम<br>• चित्रफितीचे सादरीकरण<br>• काव्य वाचन<br>• व्याख्यान<br>• खुला संवाद |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १:** महाराष्ट्र राज्यातील जल संकट<br>**भाग २:** जल व्यवस्थापन संकल्पना, आव्हाने व गरज<br>**भाग ३:** पाण्याचा ताळेबंद<br>**भाग ४:** पिण्याच्या पाण्याची मागणी आणि पुरवठ्याचे व्यवस्थापन<br>**भाग ५:** निधीचे स्त्रोत |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ सादरीकरण<br>▶ स्केच पेन<br>▶ मार्कर<br>▶ बाऊल<br>▶ छोट्या आकाराच्या चिठ्या |

## सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| **२० मिनिटे** | <u>भाग १: महाराष्ट्र राज्यातील जल संकट</u><br>१. सत्राची सुरुवात तक्ता क्र.५ मध्ये दिलेल्या **'मी थेंब एक पाण्याचा'** कवितेने करावी. कवितेचे वाचन झाल्यानंतर तक्ता क्र. ६ मध्ये दिलेल्या खेळाच्या माध्यमातून काही प्रश्नांची उत्तरे प्रशिक्षणार्थीकडून प्राप्त करून घ्या.<br>२. खेळ पूर्ण झाल्यानंतर जलचक्र समजून सांगून पावसाव्दारे प्राप्त होणारे पाणी वाहून किती प्रमाणात जाते, बाष्पीभवन किती होते, आद्रतेच्या प्रमाणात किती राहते इ. बाबी पुढील लिंक मध्ये दिलेल्या चित्रफितीच्या सहाय्याने स्पष्ट कराव्यात. |

| | |
|---|---|
| | https://www.youtube.com/watch?v=iDa_ZHxqc6M&t=20s<br>३. यानंतर राज्यात जल संकट निर्माण होण्यामागील कारणे विस्तारित पणे स्पष्ट करा. |
| २० मिनिटे | **भाग २: जल व्यवस्थापन संकल्पना, आव्हाने व गरज**<br>१. सर्वप्रथम तक्ता क्र. ७ मध्ये दिलेल्या एक लहान कुटुंबाच्या उदाहरणातून व्यवस्थापन म्हणजे काय हे समजून सांगा.<br>२. या नंतर एका निश्चित लोकसंख्येसाठी पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी आणि उद्योगांसाठी पाणी या तीनही क्षेत्रांतील सर्व समस्या-प्रश्नांचा विचार करून, सर्वांना समान न्याय या तत्त्वावर पाणी वाटपाचे धोरण ठरविणे म्हणजेच जल व्यवस्थापन हे समजून सांगा.<br>३. सत्राच्या पुढील भागात राज्यात निर्माण होणाऱ्या पाणी पुरवठा सुविधेतून नियमित पाणी पुरवठा करण्यात आज राज्यासमोर असलेली खालील आव्हाने समजून सांगा.<br>- पाण्याचा बेसुमार वापर<br>- जलसिंचन क्षमतेचा अपुरा वापर<br>- जल प्रदूषण<br>- वाढती लोकसंख्या व पाण्याची मागणी<br>- अपुरा लोकसहभाग व नियोजनाचा अभाव<br>- दुष्काळाचे संकट |
| १५ मिनटे | **भाग ३: पाण्याचा ताळेबंद**<br>यानंतर गावातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धतता व मागणीची संकल्पना व महत्व विषद करावेत. तसेच पाण्याची उपलब्धता व मागणी समजून घेण्यासाठी पाण्याच्या ताळेबंदाचे महत्व विषद करून १०० लोकसंख्या असलेल्या व ५५ ली. प्रतिदिन पाण्याची गरज या प्रमाणे एखाद्या वस्तीच्या उदाहरणातून पिण्याच्या पाण्याच्या ताळेबंद तयार करण्याची कार्यपध्दत विषद करावी. |
| ३५ मिनिटे | **भाग ४: पिण्याच्या पाण्याची मागणी आणि पुरवठ्याचे व्यवस्थापन**<br>सत्राच्या पुढील भागात खालील मुद्द्यांच्या आधारे पिण्याच्या पाण्याची मागणी आणि पुरवठ्याच्या व्यवस्थापनाची कार्यपद्धत थोडक्यात समजून सांगावी.<br>- स्त्रोताच्या परिसरात जल व मृदू संधारणाची कामे हाती घेणे<br>- जल प्रदूषणास आळा घालणे<br>- शेत क्षेत्रात पाण्याचा काट कसरीने वापर करणे<br>- सांडपाण्याचा पुनर्वापर<br>- जल-लेखा परीक्षण<br>- जल साक्षरता<br>- घरगुती स्तरावर पाण्याची बचत<br>- लोकसहभाग वाढविणे इ. |
| १५ मिनिटे | **भाग ५: निधीचे स्त्रोत**<br>१. स्त्रोत बळकटीकरणासाठी १५वा वित्त आयोगाच्या निधीच्या वापराबद्दल तसेच रोजगार हमी योजनेतून करता येवू शकणाऱ्या कामांची स्पष्टता आणावी.<br>२. खालील लिंक मध्ये दिलेली चित्रफीत दाखवून जर वेळेत जल संकटा विषयी जागृतता निर्माण नाही केली तसेच आता योग्य पाऊले नाही उचलली तर भविष्यात निर्माण होणारे पाण्याच्या दुर्भिक्षतेचे चित्र समजून सांगा व सत्राचा समारोप करा.<br>https://www.youtube.com/watch?v=AZeKvZegBQw |

## तक्ता क्र. ५ मी थेंब एक पाण्याचा

मी थेंब एक पाण्याचा, मी स्वर जीवनगाण्याचा
घ्या वसा मला जपण्याचा... मी थेंब एक पाण्याचा
मी पाउस होऊन झरतो, मी नदीतून वाहतो
मी जलाशयी थांबतो, मग तहानही भागवतो
मी दवबिंदू, अन् मी गंगा, मी सिंधू
मी आनंदाचा, अन् दु:खाचा अश्रूबिंदू
मी ऋतू आणतो रसरसण्याचा... मी थेंब एक पाण्याचा
मी असता मोल न माझे, मी नसता रोप न ताजे
माझ्याविन  कोरड ओठी, माझ्याविन  गरीब राजे
मी हिरवाई... मी सळसळती तरूणाई
माझ्यामुळेच फुलतात फुले, अन् वनराई
मी नाद ईश्वराच्या हसण्याचा... मी थेंब एक पाण्याचा
विनवून तुम्हा सांगतो पुन्हा, सांभाळा या थेंबाला
मी अमृत या जगताचे, आहे जपून ठेवा मजला
अडवा, जिरवा, पण घालवू नका वाया
माझ्याविन  जीवन नाही,अन वणवण केवळ पाया
आधारच मी तुमच्या जगण्याचा... मी थेंब एक पाण्याचा

**>> डॉ. प्रमोद बेजकर**

**या सत्राविषयीचे सादरीकरण पाहण्यासाठी वरील QR code स्कॅन करा**

## तक्ता क्र. ६ फिश बाऊल गेम

कवितेचे वाचन झाल्यानंतर खालीलप्रमाणे फिश बाऊल गेमच्या माध्यमातून खालील प्रश्नांची उत्तरे प्रशिक्षणार्थीकडून प्राप्त करून घ्या.

सर्वप्रथम प्रशिक्षणार्थींची तीन गटात विभागणी करा प्रत्येकी एका गटास खालीलपैकी एक प्रश्न देवून किमान ३ उत्तरे लिहण्यास सांगा. प्रश्नाची प्रत्येक उत्तरे छोट्या कागदाच्या स्वतंत्र तुकड्यावर लिहण्याची सूचना करा (प्रत्येक गटाने किमान ३ उत्तरे याप्रमाणे) वितरीत करा.

१. मानवी जीवनात पाण्याचे मोल काय आहे?
२. पाणी जर अमुल्य असेल तर आपण त्याचा वापर कसा करतो?
३. तुमच्या गावात पाण्याचे संकट निर्माण होण्यामागील मुख्य कारणे कोणती?

प्रश्नांची उत्तरे लिहून झाल्यानंतर एका बाऊल मध्ये प्रश्नांची उत्तरे गोळा करा व प्रत्येक गटातून ३ प्रतिनिधी या प्रमाणे एकूण 9 प्रतिनिधीना पुढे आमंत्रित करा. प्रत्येक प्रतिनिधीस बाऊल मधील एक चिठ्ठी उचलून ती वाचण्यास सांगावी व चिठ्ठीतील उत्तर समजून सांगण्यास सांगावे व आवश्यकतेनुसार सुलभीकरण करावे.

## तक्ता क्र. ७ व्यवस्थापन म्हणजे काय?

खालीलप्रमाणे लहान कुटुंबाचे उदाहरण देवून प्रशिक्षणार्थींना व्यवस्थापन म्हणजे काय ते समजून सांगा.

साधं एका लहान कुटुंबातील उदाहरण पहा. एक कुटुंब चालवायचं म्हणजे त्याच्या गरजा, उत्पन्न, व्यवस्था व प्रत्येक सदस्यांना कुवतीनुसार वाटून घ्यावे लागते ते काम. आता जसं कुटुंब लहान-मोठे, ज्या परिसरात रहाते, अवतीभवती काय वातावरण आहे त्यानुसार गरजा-उत्पन्न कमी-जास्त होणं शक्य आहे, त्याप्रमाणे व्यवस्था लावावी लागते आणि त्यावरून प्रत्येकाची भूमिका ठरते. कुटुंब आनंदी रहाण्याची खात्रीची गुरुकिल्ली म्हणजे गरजा किमान ठेवण्याची सवय, योग्य उत्पन्नाकरिता शिस्तबद्ध प्रयत्न, आपापल्या भूमिकेस योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी पूरेसे शिक्षण आणि त्यानंतर त्यावर प्रामाणिक मेहनत. मात्र जर कुटुंबातील सदस्यांना घरातील एकूण आर्थिक आवक किती आहे याची नेमकी कल्पनाच नसेल तर ते आपल्या गरजा मर्यादित ठेवतील का? सर्वच नियोजन बिघडणार नाही का?

**व्यवस्थापन सुयोग्य हवे असेल तर आवक – जावक हिशेब ठेवण्याची सवय महत्त्वाची होय.**

प्रत्येकाच्या जीवनामध्ये व्यवस्थापन महत्वाचे आहे. एखादी कृती कार्य पूर्ण करण्यासाठी उपलब्ध परिस्थिती सोयी सुविधा, मानवी व भौतिक साधन-सामग्री इत्यांदींचा नियोजनबद्ध वापर करून केलेली कार्यवाही म्हणजेच व्यवस्थापन. दैनंदिन जीवनात पाणी वापर हा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे जलव्यवस्थापन व त्याचे महत्व प्रत्येकाला जाणून घ्यावे लागेल.

## दिवस दुसरा

# सत्र क्र. २.१ पाणी गुणवत्ता सनियंत्रण व व्यवस्थापन

| | |
|---|---|
| सत्राचा उद्देश | १. सुरक्षित पाण्याचे महत्त्व, पाणी दूषित होण्याची कारणे आणि दुषित पाण्यामुळे मानवी आरोग्यावर होणारे परिणाम याबद्दल माहिती देणे<br>२. जेजेएम अंतर्गत पाणी गुणवत्ता परीक्षण, सनियंत्रण आणि व्यवस्थापनसंबंधीच्या तरतुदी स्पष्ट करणे<br>३. पाण्याच्या गुणवत्तेची चाचणी आणि स्वच्छता सर्वेक्षणासाठी आयोजित करावयाच्या उपक्रमांची विस्तृत माहिती देणे<br>४. सुरक्षित पाणी पुरवठ्यासाठी सामुदायिक आणि घरगुतीस्तरावर प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपायांचे वर्णन करणे |
| सत्राचा कालावधी | ६० मिनिटे |
| सत्र सुलभीकरणाची पद्धत | • खेळ<br>• चित्रफितीचे सादरीकरण<br>• खुला संवाद<br>• कल्पनाविस्फोट<br>• व्याख्यान<br>• प्रात्यक्षिक |
| सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय | **भाग १**: सुरक्षित पाण्याचे महत्व<br>**भाग २:** पाणी गुणवत्ता परीक्षण, सनियंत्रण आणि व्यवस्थापनसंबंधीच्या तरतुदी<br>**भाग ३:** पाण्याच्या गुणवत्तेची चाचणी आणि स्वच्छता सर्वेक्षणासाठीचे उपक्रमे<br>**भाग ४:** सुरक्षित पाणी पुरवठ्यासाठीच्या उपाययोजना |
| सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री | ▶ सादरीकरण<br>▶ फुगे<br>▶ स्केच पेन<br>▶ मार्कर<br>▶ FTK<br>▶ TCL पावडर<br>▶ OT कीट<br>▶ चार्ट पेपर |

## सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| २० मिनिटे | भाग १: सुरक्षित पाण्याचे महत्व |

| | |
|---|---|
| | १. थोडक्यात चर्चा करायच्या मुद्द्यांचा समावेश करून सत्राची सुरुवात करा.<br><br>२. तक्ता क्र. ८ मध्ये दिल्यानुसार शुध्द पाणी म्हणजे काय ते समजून सांगा व सुरक्षित पाणी म्हणजे नेमके काय आणि त्याचे महत्त्व यावर चर्चा करा.<br>३. तदनंतर खालील लिंक वर दिलेल्या चित्रफितीच्या आधारे पिण्याचे पाणी दूषित होण्याचे स्त्रोत स्पष्ट करा.https://www.youtube.com/watch?v=8sCL4w9d_YE<br>४. चित्रफितीच्या सादरीकरणानंतर दुषित पाणी पिल्याने आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणाम खालील चित्र क्र.१ च्या सहाय्याने समजून सांगा. |
| **१५ मिनटे** | <u>भाग २: पाणी गुणवत्ता परीक्षण, सनियंत्रण आणि व्यवस्थापनसंबंधीच्या तरतुदी</u><br><br>१. यानंतर गावात शुध्द पाणी पुरवठा होण्यासाठी पाणी गुणवत्ता व्यवस्थापनाचे महत्व विषद करावे. याचबरोबर जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सुचनेत पाणी गुणवत्ता व्यवस्थापनासाठी करण्यात आलेल्या तरतूदी विषद करा.<br>२. यानंतर छत्तीसगड शासनाने FTK द्वारे पाणी गुणवत्तेच्या नियमित तपासणीसाठी सुरु केलेल्या 'जल भगिनी' या नाविन्यपूर्ण संकल्पनेची खालील लिंक मध्ये दिलेल्या चित्रफितीद्वारे समजून सांगा.(<u>छतीसगड जल बहिणी</u> )<br>३. आपल्याही गावात अशाच पद्धीतीने महिलांची निवड करून त्यांना पाणी गुणवत्तेच्या नियमित तपासणीसाठी प्रेरित करा. |
| **१५ मिनटे** | <u>भाग ३: पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी आणि स्वच्छता सर्वेक्षणासाठीचे उपक्रमे</u><br><br>१. सर्वप्रथम एक चार्ट पेपर घेवून धावता तक्ता क्र.९ मध्ये दिल्यानुसार हिरव्या रंगाच्या चौकटी मध्ये दिलेले शब्द लिहून घ्यावेत. यानंतर तक्ता क्र. १०मध्ये दिल्यानुसार खेळाच्या माध्यमातून खालील मुद्दे विश्लेषित करावेत.<br>- स्वच्छता सर्वेक्षणाची संकल्पना, गरज आणि सर्वेक्षणाची कार्यपध्दत समजावून सांगावी. व स्वच्छता सर्वेक्षणातील ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या भूमिका स्पष्ट कराव्यात.<br>- तदनंतर पाण्याच्या रासायनीक व जैविक घटकांचे मापदंड समजून सांगावे.<br>- यानंतर गावस्तरावर उपलब्ध असलेल्या फिल्ड टेस्ट किटव्दारे पाणी गुणवत्ता तपासणीची गरज व व सदर किटव्दारे कोणकोणत्या घटकांची तपासणी करता येऊ शकेल या बाबत चर्चा करावी. चर्चेदरम्यान खालील लिंक वर दिलेल्या चित्रफिती दाखवाव्यात.<br>https://www.youtube.com/watch?v=_VunteelJpU<br>https://www.youtube.com/watch?v=714WB8GkHXw<br>https://www.youtube.com/watch?v=FiMRqVbyItg<br>• यानंतर जिल्हा व तालुकास्तरावरील प्रयोगशाळेमध्ये रासायनिक व जैविक तपासणीची कार्यपध्दत, कालावधी इ. बाबतची माहिती दयावी. तसेच यासंबंधीची जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायतीची भुमिका स्पष्ट करावी.<br>• FTK उपलब्ध असल्यास एक-दोन घटकांची तपासणी करून दाखवा. |

| | |
|---|---|
| १० मिनटे | भाग ४ : सुरक्षित पाणी पुरवठ्यासाठीच्या उपाययोजना<br>१. सत्र पुढे चालू ठेवून हाती घ्यावयाच्या प्रतिबंधात्मक उपायांची आणि उपचारात्मक कृतीची माहिती दयावी.<br>२. सर्वप्रथम सादरीकरणातील मुद्द्यांच्या आधारे गावातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे संरक्षण कसे करता येईल या बाबतची माहिती दयावी.<br>३. तदनंतर पिण्याच्या पाण्याच्या निर्जंतुकीकरणासाठी वापरल्या जाणा-या टीसीएल पावडर ची माहिती,त्याच्या साठवणूकीची पध्दत आणि वापराचे प्रमाण विश्लेषीत करून पाणी निर्जंतुकीकरणाची कार्यपध्दत समजावून सांगावी. तदनंतर ओटी टेस्ट किट ची सविस्तर माहिती दयावी. तसेच या अनुषंगाने प्रात्यक्षिक करून दाखवावे. |

## तक्ता क्र. ८. शुद्ध पाणी म्हणजे काय ?

तीन काचेचे ग्लास/ प्लास्टिक पाण्याच्या बाटल्या घ्या. प्रत्येक बाटलीत पिण्याचे पाणी भरून घ्या. त्यापैकी पाण्याने भरलेल्या एका बाटलीत मीठ टाका दुसऱ्या बाटलीत साखर टाका तर तिसरी बाटली तशीच पिण्याच्या पाण्याने भरलेली ठेवा.


यानंतर पाण्याच्या बाटल्या प्रशिक्षणार्थींना द्या व त्यातील एक घोट पिवून इतर सहभागींना ती बाटली देण्यास सांगा. पाणी पिवून झाल्यानंतर पाण्याची चव कशी लागली या बाबत त्यांच्या प्रतिक्रिया घ्या.

यानंतर पाणी कसे असावे? हे खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करावे

१. पाणी चवीला चांगले असावे. तुरट, खारट, तेलकट नसावे.
२. दिसायला स्फटिकासारखे स्वच्छ, रंगहीन आणि तळ दाखविणारे असावे.
३. पाण्याला कसलाही वास नसावा, शैवाल नसावे.
४. अपायकारक रासायनिक द्रव्ये प्रमाणाबाहेर किंवा मुळीच नसावी.
५. पाण्यात अपायकारक जिवाणू किंवा विषाणू नसावेत.
६. पाण्याचा सामू pH ६.५ ते ८.५ इतका असावा.

या सत्राविषयीचे सादरीकरण पाहण्यासाठी वरील QR code स्कॅन करा


# चित्र क्र. १ दुषित पाण्यामुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम







To know if water potable or not, get it tested in a laboratory





Adverse effects of drinking water with chemical contamination

**Blue baby syndrome with nitrate contamination**





## धावता तक्ता क्र. ९ पाणी गुणवत्ता तपासणी, सनियंत्रण व व्यवस्थापन



## तक्ता क्र. १० पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी आणि स्वच्छता सर्वेक्षणासाठीचे उपक्रमे व सुरक्षित पाणी पुरवठ्यासाठीच्या उपाययोजना फुग्यांचा खेळ

१. छोट्या कागदी तुकड्यावर वरील गुलाबी रंगाच्या चौकटीत दिलेल्या शब्दांच्या चिठ्या करून घ्याव्यात.

२. यानंतर सदरच्या चिठ्ठ्यांची घडी करा व त्या वेगवगळया फुग्यामध्ये घाला. प्रत्येक लाल चौकटीत जो क्रमांक लिहिला आहे तोच क्रमांक फुग्यावर लिहा.

३. प्रशिक्षणार्थीमधून ७-८ प्रतिनिधीना पुढे येण्याची सूचना करावी व प्रत्येकाला एक एक फुगा देवून तो फुगविण्यास सांगावा.

४. या नंतर फुगविलेले फुगे एकत्र करून प्रशिक्षकाने खुर्चीवर उभे रहावे व सहभागींना खुर्चीच्या भोवती गोलाकार उभे राहण्यास सांगावे आणि वरून फुगे सोडल्या नंतर सहभागींना ते पकडण्यास सांगावे.

५. जो फुगा पकडेल तो जिंकेल अशी सूचना करावी. यानंतर खुर्चीवर उभे राहून फुगे सोडावेत.

६. ज्या लोकांनी फुगे पकडले त्यांना थांबण्यास सांगावे व ज्यांच्याकडे फुगे नसतील त्यांना जागेवर जावून बसण्याची विनंती करावी.

७. आता ज्यांच्याकडे फुगे आहेत त्यांना फुग्यावर लिहिलेल्या क्रमांकानुसार उभे राहण्याची विनंती करा.

८. फुग्याच्या क्रमांकानुसार फुगा फोडण्यास सांगा.

९. आता लाल चौकटीच्या क्रमांकानुसार लिहिलेले शब्द सहभागी वाचतील तो त्याना रिकाम्या तक्त्यात जावून योग्य त्या ठिकाणी लावण्याची विनंती करा.

१०.आवश्यकतेनुसार सदरची चिठ्ठी लावण्यास मदत करा व योग्य ठिकाणी लावून झाल्यानंतर त्यांना तो मुद्दा स्पष्ट करण्यास सांगा सदरचे काम पूर्ण करण्यासाठी तुम्ही तुमच्या गावात नेमकं काय करणार या बाबत विचारणा करा आवश्यकतेनुसार विषयाचे सुलभीकरण करा.

### ओटी चाचणी घेण्याची पद्धत

ओटी टेस्ट करण्यासाठी क्लोरोस्कोप घ्यावा. (क्लोरोस्कोप वर विविध रंगाच्या पट्ट्या असतात , या पट्यांवर क्लोरिनचे प्रमाण किती याचे दिशा निर्देश दिलेले असतात. या दिशा निर्देशामुळे पाण्यातील क्लोरिनचे प्रमाण आपणास कळू शकते.) एका परीक्षा नळीत ज्या पाण्याची ओटी टेस्ट करायची आहे ते पाणी भरून घ्यावे. पाण्याने भरलेल्या परीक्षा नळी मध्ये दोन थेंब अर्थोक्लोरोडीनचे दोन थेंब टाकून थोडे हलवावे. यामुळे परीक्षा नळीतील पाण्याचा रंग बदलू लागेल. ही परीक्षा नळी क्लोरोस्कोपमध्ये ठेवावी. क्लोरोस्कोपवरील असलेल्या कोणत्या रंगाशी परीक्षानळीतील पाण्याचा रंग जुळतो हे बघावे. क्लोरोस्कोप वरील ज्या रंगाशी परीक्षनळीतील पाण्याचा रंग जुळेल तेव्हढे क्लोरिनचे प्रमाण आपण तपासलेल्या पाण्यात आहे असे समजावे.

## सत्र क्र. २.२ पाणी पुरवठा सुविधांची संचालन, देखभाल आणि दुरुस्ती

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | १. पाणी पुरवठा सुविधांच्या संचालन आणि देखभाल दुरुस्तीची संकल्पना आणि महत्त्व आणि जल जीवन मिशन मधील तरतुदींची माहिती देणे.<br>२. पाणी पुरवठा सुविधांच्या प्रत्येक उपांगांची व त्याच्या तांत्रिक दृष्ट्या संचालन, देखभाल व दुरुस्तीची माहिती देणे<br>३. पाणी पुरवठा सुविधांच्या प्रभावी संचालन देखभाल व दुरुस्तीसाठी आर्थिक व्यवस्थापनाचे महत्व व त्यासाठीची कार्यपद्धत विषद करणे<br>४. पाणी पुरवठा सुविधांच्या प्रभावी संचालन देखभाल व दुरुस्तीसाठी संस्थात्मक व्यवस्थापनासाठीची कार्यपद्धत समजून सांगणे. |
| **सत्राचा कालावधी** | ७५ मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • खेळ<br>• चित्रफितीचे सादरीकरण<br>• गटकार्य<br>• खुला संवाद<br>• कल्पनाविस्फोट<br>• व्याख्यान |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १:** पाणी पुरवठा सुविधांच्या संचालन आणि देखभाल, दुरुस्तीची संकल्पना आणि महत्त्व<br>**भाग २:** सुविधांच्या संचालन आणि देखभाल दुरुस्तीसाठी जल जीवन मिशन मधील तरतुदीं<br>**भाग ३:** पाणी पुरवठा सुविधांचे तांत्रिक व्यवस्थापन<br>**भाग ४:** पाणी पुरवठा सुविधांचे आर्थिक व्यवस्थापन<br>**भाग ५:** पाणी पुरवठा सुविधांचे संस्थात्मक व्यवस्थापन |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ सादरीकरण<br>▶ स्केच पेन<br>▶ मार्कर<br>▶ छोट्या आकाराच्या चिठ्या<br>▶ चार्ट पेपर |

## सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| **१० मिनटे** | <u>भाग १: पाणी पुरवठा सुविधांच्या संचालन आणि देखभाल दुरुस्तीची संकल्पना आणि महत्त्व</u><br>१. सत्राच्या सुरूवातीस सत्रादरम्यान चर्चा करावयाचे मुददे अधोरेखीत करावे.<br>२. यानंतर गावातील नळ पाणी पुरवठा योजना बंद पडण्यामागे अथवा नादुरूस्त होण्यामागची कारणे कोणती याबाबत विचारणा करावी. प्रशिक्षणार्थिंनी मांडलेले मुद्दे फलकावर लिहावीत. |

| | |
|---|---|
| | ३. जल जीवन मिशन अंतर्गत आपल्या गावात निर्माण होणारी पाणी पुरवठा योजना अशीच बंद पडली तर भविष्यात शासनामार्फत पुन्हा आपल्या गावास पाणी पुरवठा योजना मिळणार नाही याची कल्पना द्या. तसेच ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार निर्माण होणाऱ्या पाणी पुरवठा योजनेतून शाश्वत पाण्याची सेवा प्रदान करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असल्याचे स्पष्ट करा.<br>४. पाण्याची शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी ग्रामपंचायतीने आतापासूनच त्याच्या संचालन,देखभाल व दुरुस्तीचे नियोजन करणे महत्वाचे असल्याचे नमूद करा.<br>५. तदनंतर देखभाल आणि दुरूस्तीची व्याख्या स्पष्ट करून योजनेतून सुरक्षित आणि शाश्वत पाणी पुरवठा होण्यासाठी योजनेच्या संचालन, देखभाल आणि दुरूस्तीचे महत्व सादरीकरणातील मुद्द्यांच्या आधारे विशद करावे. |
| **१० मिनटे** | **<u>भाग २: सुविधांच्या संचालन आणि देखभाल दुरुस्तीसाठी जल जीवन मिशन मधील तरतुदी</u>**<br><br>सत्राच्या पुढील भागात पाणी पुरवठा सुविधांच्या संचालन देखभाल व दुरुस्ती संबंधी जल जीवन मिशनमध्ये करण्यात आलेल्या तरतुदी खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.<br>- पाणी पुरवठा सुविधांच्या संचालन देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी आता ग्राम पंचायतीची असेल .<br>- तांत्रिक व्यवस्थापनासाठी क्षेत्रीयस्तरावर तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती<br>- पाणी पट्टी आकारणी व त्याची वसुली<br>- पाणी पुरवठा योजना चालविणाऱ्या मनुष्यबळाची व समित्यांची क्षमता बांधणी<br>- जल लेखा परीक्षण<br>- योजनेच्या प्रभावी संचालनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब |
| **३० मिनटे** | **<u>भाग ३: पाणी पुरवठा सुविधांचे तांत्रिक व्यवस्थापन</u>**<br><br>१. सत्राच्या या भागात योजनेतील प्रत्येक उपांगाचे आयुष्य किती असते हे सादरीकरणाच्या माध्यमातून समजावून सांगा. यानंतर योजनेचे प्रत्येक उपांग त्याच्या निर्धारित आयुष्यमानानुसार सुरळीतपणे कार्यरत राहण्यासाठी त्याचे तांत्रिक व्यवस्थापन करणे महत्वाचे असल्याचे नमूद करा.<br>२. उपांगे सुरळीतपणे कार्यरत राहण्यासाठी या उपांगांचे संचालन, देखभाल व दुरुस्तीची आवश्यकता स्पष्ट करा.<br>३. यानंतर खाली दिलेल्या लिंकवरील चित्रफित दाखवा व सारिणी क्र.१ मध्ये दिल्यानुसार गटकार्याच्या आधारे पाणी पुरवठा सुविधांच्या संचालन, देखभाल व दुरुस्तीची कार्यपद्धत विषद करा.<br>(95) Jalswarajya O&M Part 2 of 2.flv - YouTube |
| **१५ मिनटे** | **<u>भाग ४: पाणी पुरवठा सुविधांचे आर्थिक व्यवस्थापन</u>**<br><br>१. सत्राच्या या भागात योजनेच्या शाश्वत संचालन, देखभाल आणि दुरूस्तीसाठी आर्थिक व्यवस्थापनाचे महत्व विषद करावे.<br>२. तदनंतर योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करताना योजना चालविण्यासाठी कोण-कोणत्या बाबीवर खर्च करावा लागेल या बाबत विचारणा करावी. उदा. पाणी पुरवठा कर्मचाऱ्याचे मानधन, वीजबिल, देखभाल व दुरुस्ती खर्च, घसारा इ. प्रशिक्षणार्थींनी मांडलेले मुद्दे व सुटलेले मुद्दे फलकावर लिहावेत.<br>३. एका उदाहणाच्या मदतीने तक्ता क्र. ११ मध्ये मांडलेल्या खर्चाच्या तपशिलानुसार खर्चाचे |

| | |
|---|---|
| | अंदाजपत्रक तयार करून दाखवावे.<br>४. यानंतर खर्च भागविण्यासाठी खालील निधीचे स्त्रोत समजून सांगावेत.<br>- पाणी पट्टी आकारणी<br>- व्यावसायिक नळ जोड<br>- १५ वा वित्त आयोगाचा निधी<br>- रोजगार हमी योजना<br>- CSR निधी<br>- श्रमदान<br>- ग्रामपंचायत निधी इ.<br>५. यानंतर पाणीपट्टी गोळा करण्याची कार्यपद्धत (उदा. घरोघरी भेट देवून, ग्राम पंचायत काऊंटरव्दारे) समजून सांगावेत.<br>६. चर्चा करताना जल मापक (१०० टक्के मीटरिंग) वर भर द्यावा<br>७. पाणी पट्टी आकारणीच्या नाविन्यपूर्ण पद्धती उदा. पाणी पट्टी बिल, QR कोड द्वारे ऑनलाइन भरणा इ. बाबी देखील समजून सांगाव्यात. |
| **१० मिनिटे** | **भाग ५: पाणी पुरवठा सुविधांचे संस्थात्मक व्यवस्थापन**<br><br>१. सत्राच्या या भागात पाणी पुरवठा सुविधांच्या प्रभावी संचालन, देखभाल व दुरुस्तीसाठी पार पाडाव्या लागणाऱ्या भूमिका उदा. व्यवस्थापन, सेवा, समन्वय, गट बांधणी आणि माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम इ. विस्तारितपणे तपशीलवार सांगा.<br>२. यानंतर देखभाल व दुरुस्तीसाठी वेगवेगळ्या मॉडेल्सचे उदा. बाह्य मनुष्यबळाची नियुक्ती, कंत्राटदार/एजन्सीची नियुक्ती करणे, महिला बचत गटांची आणि/किंवा स्थानिक गटांना संधी देणे इ. बाबी व त्यासाठी अवलंबावयाची कार्यपद्धत समजून सांगा.<br>३. यानंतर मध्यप्रदेश मध्ये महिलांच्या सहभागातून होत असलेल्या पाणी पुरवठा सुविधांच्या संचालन देखभाल दुरुस्तीची यशोगाथा खाली दिलेल्या लिंकवरील चित्रफितीतून दर्शवा –<br>https://www.youtube.com/watch?v=4UsgeBfgZAk&t=129s<br>४. सत्राच्या अखेरीस प्रशिक्षणार्थींच्या शंकांचे निरसन करून सत्राचा समारोप करावा. |

## सारिणी क्र. १ पाणी पुरवठा सुविधांच्या तांत्रीक व्यवस्थापन या विषयावर गटकार्य

| क्र. | गट क्र. | उपांगाचा तपशिल | संचालन | देखभाल | दुरुस्ती |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | पाण्याचा स्त्रोत | | | |
| २ | | पंप | | | |
| ३ | | पंपगृह | | | |
| ४ | २ | उद्धरण वाहिनी | | | |
| ५ | | पाण्याची साठवण टाकी | | | |
| ६ | | वितरण वाहिनी | | | |
| ७ | ३ | नळ | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | | पाणी गुणवत्ता | | | |
| ९ | | सांडपाणी व्यवस्थापन | | | |

## गटकार्यासाठीच्या सूचना

प्रशिक्षणार्थींची विभागणी ३ गटात करा

प्रत्येक गटास चार्ट पेपर व स्केच पेन द्या व दिलेल्या उपांगानुसार त्याच्या संचालन देखभाल व दुरुस्तीसाठी करावी लागणारी कामे रिक्त रखाण्यात नोंदविण्यास सांगा.

गटकार्य करण्यासाठी १५ मि.चा कालावधी द्या

सादरीकरणासाठी प्रती गट ५ मि.चा कालावधी द्या

प्रत्येक गटाच्या सादरीकरणानंतर महत्वाचे मुद्दे अधोरेखित करा

तक्ता क्र.११ पाणी पुरवठा योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक

## अ. संचालन खर्च

| विवरण | वार्षीक खर्चाचा तपशिल |
|---|---|
| १. जलसुरक्षकाचे मानधन | एकूण संख्या X मासिक मानधन X १२ महिने |
| २. वीजबील/ सोलर पम्प देखभाल | अ. वार्षीक स्थिर खर्च = पम्पाची अश्वशक्ती (दर/एचपी/पम्प) X १२ महिने<br>ब. वार्षीक चल खर्च = वार्षीक वापर एकक X (दर/युनीट) |
| ३. टीसीएल पावडर | एकूण आवश्यक पावडर X दर प्रती किलो X १२ महिने |
| ४. पाणी गुणवत्ता तपासणी | एकूण नमून्यांची संख्या X दर प्रती नमूना |
| ५. प्रशासकीय खर्च | मासिक खर्च X १२ महिने |
| **६. एकूण अ. (१+२+३+४+५)** | |

## ब. देखभाल व दुरूस्ती खर्च

| विवरण | वार्षीक खर्चाचा तपशिल |
|---|---|
| ६. नियमित देखभाल व दुरूस्ती (वाहिनी/ व्हॉल्व गळती) | देखभाल दुरूस्ती खर्च = एकूण भांडवली गुंतवणूक X १ टक्का |
| **एकूण ब** | |
| क. मोठया बीघाडीसाठी आरक्षित खर्च (घसारा निधी) | आरक्षित खर्च X २० टक्के (१ ते ६ खर्चाच्या २० %) |
| **एकूण देखभाल दुरूस्ती खर्च (अ + ब + क)** | |
| **ड. उत्पन्न/कर** | |
| गावातील ८० टक्के कुटूंबे पाणीपटटी भरतील असे ग्रहीत धरून | प्रती कुटूंब आकारावयाची पाणीपटटी = **एकूण देखभाल दुरूस्ती खर्च X १.२५%**<br>(एकूण देखभाल दुरूस्ती खर्च /एकूण कुटूंबांची संख्या) |



या सत्राविषयीचे सादरीकरण पाहण्यासाठी वरील QR code स्कॅन करा

## सत्र क्र. २.३ स्वच्छ गाव निर्मितीसाठीची कार्यपद्धत

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | १. हागणदारीमुक्त गावाची शाश्वततेचे घटक व अनुषंगिक घटकांच्या अमलबजावणीची कार्यपद्धत विषद करणे<br>२. सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची संकल्पना, दुष्परिणाम समजून सांगणे व अनुषंगिक व्यवस्थापनासाठी उपलब्ध तांत्रिक पर्यायांची माहिती देणे.<br>३. मैला गाळ व्यवस्थापनाची संकल्पना व अनुषंगिक व्यवस्थापनासाठी उपलब्ध तांत्रिक पर्यायांची माहिती देणे |
| **सत्राचा कालावधी** | ६० मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • चित्रफितीचे सादरीकरण<br>• खुला संवाद<br>• व्याख्यान<br>• प्रात्यक्षिक |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | भाग १: हागणदारीमुक्तीची शाश्वतता<br>भाग २: सांडपाणी व्यवस्थापन<br>भाग ३: घनकचरा व्यवस्थापन<br>भाग ४: मैला गाळ व्यवस्थापन |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ सादरीकरण<br>▶ मार्कर<br>▶ फलक |

## सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| **१० मिनिटे** | <u>भाग १: हागणदारीमुक्तीची शाश्वतता</u><br>१. सत्राची सुरुवात सत्रादरम्यान चर्चा करण्यात येणाऱ्या मुद्यानी करावी. यानंतर पहिल्या दिवशीच्या सत्र क्र. १.२ चा संदर्भ घेवून स्वच्छ गाव निर्मिती करण्यासाठी नेमक्या कोणकोणत्या घटकांचा विचार करावा लागेल या बाबत विचारणा करा. प्रशिक्षणार्थींनी मांडलेल्या मुद्द्यांची नोंद करून घ्या.<br>२. मांडलेल्या मुद्द्याच्या आधारे स्वच्छ गाव निर्मितीसाठी खालील ४ मुख्य घटकावर आधारित काम करणे हि ग्रामपंचायतीची मुख्य जबाबदारी असल्याचे नमूद करा.<br>• हागणदारी मुक्त गावाची शाश्वतता<br>• सांडपाणी व्यवस्थापन<br>• घनकचरा व्यवस्थापन<br>• मैला गाळ व्यवस्थापन<br>३. यानंतर हागणदारी मुक्तीची शाश्वतता म्हणजे काय व टी टिकवून ठेवण्याची कार्यपद्धत खालील मुद्द्यांच्या आधारे समजून सांगा.<br>• शौचालयाचा नियमित वापर |

| | |
|---|---|
| २० मिनिटे | **भाग २: सांडपाणी व्यवस्थापन**<br>१. सत्राच्या पुढील भागात राज्यातील सांडपाण्याची सद्यस्थिती व त्यामुळे मानवी आरोग्यावर व एकंदरीत पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांची माहिती द्या.<br>२. यानंतर सांडपाण्याचे प्रकार छायाचित्राच्या माध्यमातून समजून सांगा.<br>३. प्रत्येक व्यक्तीमध्ये निर्माण होरे सांडपाणी व त्याचे गांभीर्य समजून सांगण्यासाठी एक लिटर पाण्याची बाटली पाण्याने भरून घ्यावी. या भरलेल्या पाण्याच्या बाटलीतील साधारण २५ टक्के पिवून घ्यावे व उर्वरित पाण्याने भरलेली बाटली दाखवून गावात जल जीवन मिशन अंतर्गत प्राप्त होणाऱ्या पाण्यापैकी एकूण ६५ ते ७० टक्के पाणी हे संदाप्णाई स्वरुपात घराबाहेर जाणार असल्याचे सांगा.यासाठी १००० लोकसंख्या असलेल्या एका गावात ५५ लिटर पाणी रोज दिल्यानंतर किती सांडपाणी निर्माण होईल हे गणिताच्या माध्यामतून समजून सांगून. या तयार होणाऱ्या सांडपाण्यामुळे होणारे जल प्रदूषण, अस्वच्छता या बाबत उदाहरणाच्या माध्यमातून समजून सांगा.<br>४. सत्राच्या पुढील भागात गावात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याच्या पर्यावरण पूरक व्यवस्थापनासाठी वैयक्तिक व सार्वजनिकस्तरावर असलेले तांत्रिक पर्याय समजून सांगावेत. |
| १५ मिनिटे | **भाग ३: घनकचरा व्यवस्थापन**<br>१. सत्राच्या या भागात राज्यातील घन कचऱ्यामुळे निर्माण होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून द्यावी.<br>२. वेगवेगळया प्रकारचा जैविक व अजैविक कचरा छायाचित्र अथवा प्रत्यक्ष गोळा करून सत्रासाठी उपलब्ध ठेवा. यानंतर काही निवडक प्रशिक्षणार्थीना पुढे आमंत्रित करून गोळा केलेल्या कचऱ्यापैकी जैविक व जैविक कचरा कोणता हे ओळखण्यास सांगा.<br>३. ओळखण्यात अडचणी आल्यास कचऱ्याचा प्रकार समजून सांगा. यानंतर जैविक व अजैविक कचरा म्हणजे काय हे समजून सांगून त्याचे विविध प्रकार सोबत असलेल्या कचऱ्याच्या आधारे समजून सांगावे.<br>४. यानंतर कचऱ्याचे घटक समजून सांगावे व वैयक्तिक व सार्वजनिक स्तरावर जैविक कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी उपलब्ध असलेल्या तांत्रिक पर्यायांची माहिती द्यावी.<br>५. यानंतर गोबर्धन कार्यक्रमाची थोडक्यात माहिती देवून त्याचा अवलंब करण्यासाठी आवाहना करावे |
| १५ मिनिटे | **भाग ४: मैला गाळ व्यवस्थापन**<br>१. सत्राच्या या भागात मैला गाळ व्यवस्थापनाची व्याख्या समजून सांगा. यानंतर राज्यात बांधण्यात आलेले शौचालयाचे प्रकार व त्याचे प्रमाण समजून सांगा.<br>२. यानंतर मैला गाळाच्या व्यवस्थापनासाठीची सेवा मुल्य साखळी समजून सांगा. मुली साखळीतील प्रत्येक घटक समजून सांगताना प्रत्येक घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी असलेले तांत्रिक पर्याय समजून सांगावे.प्रशिक्षणार्थीना सत्राविषयी काही शंका असल्यास त्याचे निरसन करावे व सत्राचा समारोप करावा. |

या सत्राविषयीचे सादरीकरण पाहण्यासाठी वरील QR code स्कॅन करा

## सत्र क्र. २.४ प्रक्षेत्र भेटीची तयारी व प्रक्षेत्र भेट

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | १. प्रक्षेत्र भेटीचा उद्देश कळावा.<br>२. प्रक्षेत्र भेटीची तयारी व्हावी व भेटी दरम्यानच्या प्रशिक्षणार्थींना आपल्या भूमिका व जबाबदा-या कळाव्यात. |
| **सत्राचा कालावधी** | ३० मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • गट कार्य<br>• खुली चर्चा |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १:** प्रक्षेत्र भेटीचा उद्देश व प्रक्षेत्र भेटीची तयारी<br>**भाग २:** भेटी दरम्यानच्या प्रशिक्षणार्थींच्या भूमिका व जबाबदा-या |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ तपासणी सूची<br>▶ स्केच पेन<br>▶ चार्ट पेपर<br>▶ मार्कर |

## सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| **१० मिनटे** | <u>भाग १: प्रक्षेत्र भेटीचा उद्देश व प्रक्षेत्र भेटीची तयारी</u><br>१. सत्राच्या या भागात सादरीकरणाच्या सहाय्याने प्रक्षेत्र भेटीचा उद्देश समजून सांगावा.<br>२. यानंतर प्रशिक्षणार्थींची खालील विषयास अनुसरून गटात विभागणी करावी.<br>**गट क्र. १.** विहीर व पंप<br>**गट क्र. २.** पंपगृह व उद्धरण वाहिनी<br>**गट क्र. ३.** पाणी गुणवत्ता व्यवस्थापन<br>**गट क्र. ४.** पाण्याची साठवण टाकी व वितरण वाहिनी<br>**गट क्र. ५.** आर्थिक व्यवस्थापन व संस्थात्मक व्यवस्थापन<br>३. गट निर्मिती झाल्यानंतर प्रत्येक गटास विषय दिल्यानुसार खालील तपासणी सूची क्र.१व २ वितरीत करावी व सदर तपासणी सूचीच्या आधारे क्षेत्र भेटीदरम्यान अनुषंगिक बाबींची पडताळणी करण्यास सांगावी.<br>४. सूचना देवून झाल्यानंतर आप-आपल्या गटात बसून तपासणी सुचीवर चर्चा करण्यास सांगावी. |

| २० मिनिटे | <u>भाग २:  भेटी दरम्यानच्या प्रशिक्षणार्थींच्या भूमिका व जबाबदा-या</u><br><br>१. सत्राच्या या भागात पडताळणी दरम्यान महत्वाची निरीक्षणे नोंदविण्यास सांगावीत.<br>२. प्रत्येक गटास गटप्रमुखाची निवड करण्यास सांगावी व गटावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी गटप्रमुखास द्यावी.<br>३. क्षेत्र भेटी दरम्यान प्रशिक्षणार्थींच्या भूमिका व जबाबदाऱ्या सादरीकरणाच्या सहाय्याने समजून सांगाव्यात. |
|---|---|

## तपासणी सूची क्र. १ प्रक्षेत्र भेटी दरम्यान पाणी पुरवठा सुविधांच्या पडताळणीसाठी गटांनी वापरावयाची तपसणी सूची

| **१. उद्भव (साधी विहीर, न.पा.पु विहीर)** | **होय /नाही** | **निरीक्षणे** |
|---|---|---|
| १. स्रोतास पाण्याची पुरेशी उपलब्धता आहे का? बारमाही?आठमाही?<br>२. विहीरीचे/कट्ट्याचे बांधकाम सुस्थितीमध्ये आहे का व ते पूररेषेच्या वर आहे का?<br>३. विहीरीचे पाणी पिण्यास योग्य आहे का?<br>४. स्रोताच्या भोवतालचा परिसर स्वच्छ आहे का?<br>५. विहीरीत गाळ पडलेला आहे का?<br>६. स्रोत बळकटीकरणाची उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत का?<br>७. उद्भवाभोवती सांडपाणी निचरा व्यवस्था आहे का?<br>८. विहीरीभोवती कुंपण आहे का? | | |
| **२. पंपिंग मशिनरी** | | |
| १. पंपाचे लॉगबुक ठेवले आहे का?<br>२. गरजेपुरताच पंप चालविला जातो का?<br>३. पंप सुरु असताना कंपने अथवा आवाज येतो का?<br>४. विहीरीतील पाण्यात तरंग उठतात का?<br>५. पंप त्याच्या क्षमतेप्रमाणे पाणी फेकतो का? टाकी वेळेत भरते का?<br>६. पंपासाठी पर्यायी व्यवस्था आहे का? व रोज दोन्ही पंप वापरले जातात का? | | |

| | | |
|---|---|---|
| ७. पर्पिंग मशिनरीची किमान वर्षातून एकदा तपासणी केली जाते का? | | |
| **३. पंपगृह** | | |
| १. भिंतीला/स्लॅबला तडे आहेत का?<br>२. पंपगृहाचा ओटा पूररेषेच्या वर आहे का?<br>३. पंपगृहातील इलेक्ट्रिफिकेशनची व्यवस्था चांगल्या प्रतीची आहे का?<br>४. पंपगृहासाठी आर्थिंगची व्यवस्था चांगली केलेली आहे का?<br>५. पावसाळ्यात पंपगृहापर्यंत जाता येते का?<br>६. पंपगृहात व्होल्टमीटर, ॲम्पीअर मीटर बसविले आहे का?<br>७. पंपगृहात सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असणारे साहित्य उपलब्ध आहे का? (उदा. टेस्टर, पकड, पान्हे, फ्युज, वायर,प्रथमोपचार पेटी इ.) | | |
| **४. उध्दरणवहिनी (साधारणः पंपापासुन ते साठवण टाकी पयत)** | | |
| १. उध्दरणवहिनीला कोठे गळती आहे का?<br>२. उध्दरणवहिनीला कोठे नळजोड आहेत का?<br>३. उध्दरणवहिनीला बसविलेले वेगवेगळे व्हॉल्व्ह योग्य पध्दतीने कार्यरत आहेत का? | | |
| **५.साठवण टाकी** | | |
| १. साठवण टाकीला कोठे गळती आहे का?<br>२. साठवण टाकी महिन्यातून एकदा साफ केली जाते का? टाकीवर टाकी स्वच्छ केल्याची तारीख लिहिली जाते का?<br>३. साठवण टाकीला विद्युतरोधक/पाण्याची पातळी दर्शक बसविलेआहे का?<br>४. साठवण टाकीवर आणि साठवण टाकीमध्ये उतरण्यासाठी शिडीची व्यवस्था आहे का? ती गंजलेली आहे का?<br>५. टाकीला झाकण आहे का? व ते नेहमी बंद ठेवले जाते का? | | |

| | | |
|---|---|---|
| ६. टाकी सभोवती कुंपण आहे का?<br>७. टाकीजवळचे व्हॉल्व्ह गळके आहेत का?<br>८. टाकीचा परिसर स्वच्छ आहे का? गुरे व इतर जनावरे तेथे बांधतात का?<br>९. टाकीतून ओव्हर फ्लो होणा-या पाण्याची व्यवस्था केलेलीआहे का? (वितरण व्हॉल्व्हच्या पुढे जोडणी केली आहे का?) | | |
| **६.वितरण व्यवस्था** | | |
| १. गावामध्ये सर्व भागात सम दाबाने पाणी उपलब्ध होते का? (झोनिंग केलेले आहे का?<br>२. वितरण व्यवस्थेला कोठे गळती आहे का?<br>३. वितरण व्यवस्थेमध्ये असलेल्या व्हॉल्व्हमध्ये कोठे गळतीआहे का? त्यांची चेंबर्स व झाकणे सुस्थितीत आहेत का?<br>४. वितरण व्यवस्थेमधील सर्व ठिकाणांच्या नळकोंड्यांना/खाजगी नळजोडांना तोट्या आहेत का?<br>५. वितरण व्यवस्थेवर कोणी अनाधिकृत नळजोड घेतलेआहेत का?<br>६. गावामध्ये कोठे पाण्याचा गैरवापर होतो आहे का? सडा टाकणे, जनावरे/गाड्या धुणे इ.<br>७. गावामध्ये सांडपाणी निच-याची व्यवस्था करण्यात आलेलीआहे का? शोषखड्डे/गटारे आहेत का? | | |
| **७.पाणी गुणवत्ता व्यवस्थापन** | | |
| १. पिण्याच्या पाण्याचे नियमित निर्जंतुकीकरण केले जाते का?<br>२. ब्लिचिंग पावडरची साठवण योग्य केली जाते का?<br>३. नियमित ओ.टी. चाचण्या घेऊन त्याच्या नोंदी ठेवल्या जातात का?<br>४. आवश्यकतेनूसार ब्लिचिंग पावडरचे मदर सोल्यूशन तयार करून वितरीत केले जाते का? | | |

| | | |
|---|---|---|
| ५. पावसाळयामध्ये पिण्याच्या पाण्यामध्ये तुरटीचा उपयोग केला जातो का?<br>६. पिण्याच्या पाण्याच्या उद्भवांचा प्राधान्यक्रम ठरविला आहे का?<br>७. पाणी नमुना तपासणी (एच.टू.एस. द्वारे) केली जाते का?<br>८. पाणी नमुना तपासणी (प्रयोगशाळेद्वारे-जैविक/रासायनिक) केली जाते का?<br>९. दूषित पाण्याविषयी योग्य ती कार्यवाही केली जाते का?<br>१०.FTK उपलब्ध आहे का?<br>११.FTK चा नियमित वापर होतो का?<br>१२.पाच महिलांची निवड करण्यात आली आहे का?<br>१३.FTK नोंदवही अद्यावत ठेवली आहे का? | | |
| **८.आर्थिक व्यवस्थापन** | | |
| १. पाणीपुरवठा सुविधेचे वार्षिक अंदाजपत्रक तयार केले जाते का?<br>२. पाणीपट्टीची १०० % वसुली होते का?<br>३. पाणीपट्टीचा दर पुरेसा आहे का?<br>४. पाणीपट्टी वसुलीसाठी वेगळी व्यवस्था आहे का?<br>५. पाणीपट्टी न भरणा-यांसाठी दंडात्मक कार्यवाहीची व्यवस्थाआहे का?<br>६. देखभाल दुरुस्ती खर्चास समितीची/ग्रामपंचायतीची मंजूरी घेतली जाते का? | | |
| **९.संस्थात्मक रचना** | | |
| १. आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा कर्मचारी नेमले/नेमला आहे का? त्यांना नियमित पगार दिला जातो का?<br>२. पाणीपुरवठा समितीचे पाणीपुरवठा सुविधेचे व कर्मचा-यांचे 'संचालन, देखभाल व दुरुस्ती" विषयक प्रशिक्षण झालेआहे का?<br>३. तक्रार निवारणाची व्यवस्था आहे का?<br>४. गावपातळीवरील इतर उद्भवांची देखभाल, दुरुस्तीची व्यवस्था आहे का? | | |

## तपासणी सूची क्र. २. प्रक्षेत्र भेटी दरम्यान सांडपाणी व्यवस्थापन सुविधांच्या पडताळणीसाठी गटांनी वापरावयाची तपासणी सूची

| १. शोषखड्डा | होय /नाही | निरीक्षणे |
|---|---|---|
| १. शोषखड्ड्यामध्ये दररोज किती पाणी येणार याचा अंदाज बांधण्यात आला आहे का ? | | |
| २. घरापासून शोषखड्ड्यापर्यंत सांडपाणी वाहून जाण्यासाठी योग्य उतार ठेवण्यात आला आहे का ? | | |
| ३. घराच्या भिंतीपासून किमान ३ फूट अंतरावर शोषखड्डा बनविण्यात आला आहे का? | | |
| ४. शोषखड्ड्यासाठी निवडलेल्या जागेवरून वाहनांची ये-जा होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे का? | | |
| ५. जवळच्या पाण्याच्या स्त्रोतापासून ३ मीटर अंतरावर शोषखड्डा बनविण्यात आले आहे का? | | |
| ६. जमिनीतील पाण्याच्या पातळीपासून किंवा खडकाच्या थरापासून शोषखड्ड्याचा तळ किमान १ मीटर वर आहे याची खात्री करण्यात आली आहे का ? | | |
| ७. शोषखड्डाच्या आधी गाळ आणि घाण रोखण्यासाठी गाळण कुंडी / सिल्ट चेंबर बांधले आहे का ? | | |
| ८. गाळ आणि घाण रोखण्यासाठी शोषखड्ड्यामध्ये मटका बसवण्यात आला आहे का? त्यामध्ये नारळाच्या काथ्या, कोरडे गवत फिल्टर माध्यम म्हणून वापरले गेले आहे का? | | |
| ९. पावसाचे पाणी शोषखड्ड्यामध्ये जावू नये म्हणून सर्वात वरच्या फिल्टर मीडियावर ताडपत्री शीट टाकली गेली आहे का ? | | |
| १०.शोषखड्ड्याची मोजमापे हे १ मी * १ मी * १ मी (लांबी * रुंदी * खोली) घेण्यात आलेली आहे का? | | |
| ११.शोषखड्ड्यामध्ये टाकण्यात आलेला फिल्टर मीडिया हा दगड गोट्यांचा आहे का ? | | |

| २. मॅजिक पिट | | |
|---|---|---|
| १. मॅजिक पिटमध्ये दररोज किती पाणी येणार याचा अंदाज बांधण्यात आला आहे का ? | | |
| २. घरापासून मॅजिक पिटपर्यंत सांडपाणी वाहून जाण्यासाठी योग्य उतार ठेवण्यात आला आहे का ? | | |
| ३. घराच्या भिंतीपासून किमान ३ फूट अंतरावर मॅजिक पिट बनविण्यात आला आहे का? | | |
| ४. मॅजिक पिटसाठी निवडलेल्या जागेवरून वाहनांची ये-जा होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे का? | | |
| ५. जवळच्या पाण्याच्या स्त्रोतापासून ३ मीटर अंतरावर मॅजिक पिट बनविण्यात आले आहे का? | | |
| ६. जमिनीतील पाण्याच्या पातळीपासून किंवा खडकाच्या थरापासून मॅजिक पिटचा तळ किमान १ मीटर वर आहे याची खात्री करण्यात आली आहे का ? | | |
| ७. मॅजिक पिटच्या आधी गाळ आणि घाण रोखण्यासाठी गाळण कुंडी / सिल्ट चेंबर बांधले आहे का ? | | |
| ८. मॅजिक पिटची मोजमापे हे १.२ मी * १.२ मी * १.२ मी (लांबी * रुंदी * खोली) घेण्यात आलेली आहे का? | | |
| ९. मॅजिक पिटमध्ये गाळ रोखण्यासाठी गाळ टाकी (siltation tank) ठेवण्यात आली आहे का ? | | |
| १०. गाळ टाकीला फक्त वरील बाजूसच चारही दिशेस पाणी बाहेर जाण्यासाठी भोके / छिद्रे ठेवण्यात आली आहेत का ? | | |
| ११.टाकीचा तळ बंद आहे का ? | | |
| १२. मॅजिक पिटमध्ये टाकण्यात आलेला फिल्टर मीडिया हा दगड गोट्यांचा आहे का ? | | |
| १३.पावसाचे पाणी मॅजिक पिटमध्ये जावू नये म्हणून सर्वात वरच्या फिल्टर मीडियावर ताडपत्री शीट टाकली गेली आहे का ? | | |

| ३. घरगुती पाझर खड्डा | | |
|---|---|---|
| १. पाझर खड्डामध्ये दररोज किती पाणी येणार याचा अंदाज बांधण्यात आला आहे का ?<br>२. घराच्या भिंतीपासून किमान ३ फूट अंतरावर घरगुती पाझर खड्डा बनविण्यात आला आहे का?<br>३. जवळच्या पाण्याच्या स्त्रोतापासून १० मीटर अंतरावर पाझर खड्डा बनविण्यात आला आहे का?<br>४. पाझर खड्डयामधील पाणी जमिनीत मुरण्यासाठी भिंतीमध्ये छिद्रे (Honeycombs) सोडली आहेत का ? त्यांचा आकार २-२.५ इंचांचा ठेवला आहे का ?<br>५. Honeycombs विटांच्या alternate थरांमध्ये ठेवण्यात आले आहे का ?<br>६. पाझर खड्डा आरसीसी झाकणाने झाकलेला आहे का? | | |
| **४. सार्वजनिक पाझर खड्डा** | | |
| १. पाझर खड्डामध्ये दररोज किती पाणी येणार याचा अंदाज बांधण्यात आला आहे का ?<br>२. पाझर खड्डाची क्षमता दररोज येणाऱ्या सांडपाण्याच्या दुप्पट घेण्यात आली आहे का ?<br>३. घराच्या भिंतीपासून किमान १० फूट अंतरावर सार्वजनिक पाझर खड्डा बनविण्यात आला आहे का?<br>४. जवळच्या पाण्याच्या स्त्रोतापासून १० मीटर अंतरावर पाझर खड्डा बनविण्यात आला आहे का?<br>५. जमिनीतील पाण्याच्या पातळीपासून किंवा खडकाच्या थरापासून सार्वजनिक पाझर खड्डाचा तळ किमान २ मीटर वर आहे याची खात्री करण्यात आली आहे का ?<br>६. पाझर खड्डयामधील पाणी जमिनीत मुरण्यासाठी भिंतीमध्ये छिद्रे (Honeycombs) सोडली आहेत का ? त्यांचा आकार २-२.५ इंचांचा ठेवला आहे का ? | | |

| | | |
|---|---|---|
| ७. Honeycombs विटांच्या alternate थरांमध्ये ठेवण्यात आले आहे का ?<br>८. पाझर खड्डा आरसीसी झाकणाने झाकलेला आहे का?<br>९. पाझर खड्डा च्या आधी गाळ आणि घाण रोखण्यासाठी गाळण कुंडी / सिल्ट चेंबर बांधले आहे का ? | | |
| **५. गाळण कुंडी / सिल्ट चेम्बर** | | |
| १. गाळण कुंडीच्या inlet आणि outlet ला PVC Tee बसविण्यात आले आहे का ?<br>२. गाळण कुंडीच्या inlet खाली कमीत कमी १ फुटाची जागा पाणी स्थिर होण्यासाठी ठेवण्यात आली आहे का ?<br>३. गाळण कुंडीवरती झाकण बसविण्यात आले आहे का ?<br>४. गाळण कुंडीची लांबी रुंदी कमीत कमी १.५ फूट * १.५ फूट बनविण्यात आली आहे का ?<br>५. गाळण कुंडीची inlet आणि outlet levels समान पातळीवर आहे का ? | | |
| **६. गटारे / नाली** | | |
| १. नालीचा आकार U प्रकारचा आहे का ?<br>२. सांडपाणी वाहून जाण्यासाठी नालीला योग्य प्रकारचा उतार देण्यात आलेला आहे का ?<br>३. नाली सर्व ठिकाणी झाकलेली किंवा बंधिस्त आहे का ?<br>४. नालीच्या योग्य अंतरावर chamber बनविण्यात आले आहे का ?<br>५. नालीमधील गाळ नियमितपणे काढण्यात येतो का ?<br>६. नाली नादुरुस्त आहे का?<br>७. नाली अनावश्यक ठिकाणी घेण्यात आली आहे का? | | |
| **७. गावस्तरावरील सांडपाणी प्रक्रिया** | | |
| १. गावस्तरावरील सांडपाणी प्रक्रियेचे बांधकाम हे सखल भाग किवा जिथे पावसाचे पाणी साचून राहते त्याठिकाणी केलेले आहे का ?<br>२. गावस्तरावरील सांडपाणी प्रक्रियेमध्ये दररोज किती पाणी येणार याचा अंदाज बांधण्यात आला आहे का ? | | |

| | | |
|---|---|---|
| ३. सांडपाणी तंत्रज्ञान निवडीपूर्वी सांडपाण्याची गुणवत्ता तपासली होती का ? (BOD, COD Testing) | | |
| ४. सांडपाणी प्रक्रियेच्या तंत्रज्ञानापुर्वी सांडपाण्यातील गाळ आणि घाण रोकण्यासाठी silt chamber बांधण्यात आले का ? | | |
| ५. सांडपाणी प्रक्रिया तंत्रज्ञानाच्या देखभालीसाठी रस्ता आहे का ? | | |

**या सत्राविषयीचे सादरीकरण पाहण्यासाठी वरील QR code स्कॅन करा**

# दिवस तिसरा

## सत्र क्र. ३.१ प्रक्षेत्र भेटीसंबंधी अनुभव कथन व गटकार्य

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | १. प्रक्षेत्र भेटी दरम्यान आलेल्या अनुभवांची देवाण-घेवाण करणे<br>२. पाणी पुरवठा सुविधांची पाहणी करताना नेमक्याने पहावयाच्या बाबींची माहिती देणे.<br>३. सुविधेतून पाण्याची शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी करावयाच्या कामांची स्पष्टता आणणे. |
| **सत्राचा कालावधी** | ६० मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • गट कार्य<br>• खुला संवाद |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १:** प्रक्षेत्र भेटीचे अनुभव कथन |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ सादरीकरण<br>▶ स्केच पेन<br>▶ मार्कर<br>▶ चार्ट पेपर |

## सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| **६० मिनिटे** | <u>भाग १: प्रक्षेत्र भेटीचे अनुभव कथन</u><br>१. सत्राच्या या भागात प्रशिक्षणार्थींना गट निहाय बसण्याची विनंती करावी<br>२. प्रत्येक गटास आप-आपल्या गटांची निरीक्षणे व भेटीतून काय शिकायला मिळाले तसेच गावातील पाहणीतून समोर आलेल्या बाबीवर आपल्या गावात नेमक्याने काय बदल करणार याबाबत गटांतर्गत चर्चा करून चार्ट पेपर वर नोंदविण्याची विनंती करावी<br>३. यानंतर प्रत्येक गटास ५ मि. चा वेळ देवून सादरीकरण करण्यास सांगावे.<br>४. प्रत्येक गटांनी मांडलेल्या महत्वाच्या मुद्यावर चर्चा घडवून आणावी व सत्राचा समारोप करावा |

## सत्र क्र. ३.२ शासकीय योजनांचे अभिसरण

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | १. गावात निर्माण करावयाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधांच्या निर्मितीसाठी/ दुरूस्तीसाठी आवश्यक असलेल्या निधीच्या स्त्रोतांची माहिती व्हावी.<br>२. प्रस्तावित करण्यात आलेल्या स्वच्छता पाणी पुरवठ्याच्या कामांचा अंतर्भाव ग्रामपंचायत विकास आराखड्यात करण्याची कार्यपध्दत कळावी.<br>३. प्रशिक्षणार्थींना गावात निर्माण झालेल्या पाणी व स्वच्छता सुविधांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी १५ वा वित्त आयोगातील तरतुदींची माहिती व्हावी. |
| **सत्राचा कालावधी** | ७५ मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • खेळ<br>• खुला संवाद<br>• गटकार्य<br>• व्याख्यान |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १:** पाणी पुरवठा व स्वछता सबंधित कामांसाठी उपलब्ध निधीचे स्त्रोत<br>**भाग २:** पाणी पुरवठा व स्वच्छता कामांसाठी १५ वा वित्त आयोगातील तरतुदी<br>**भाग ३:** प्रस्तावित कामांचा ग्राम विकास आराखड्यात अंतर्भाव करण्याची कार्यपद्धत |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ सादरीकरण<br>▶ मार्कर<br>▶ फलक<br>▶ चार्ट पेपर व स्केच पेन |

## सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| **४० मिनिटे** | <u>भाग १: पाणी पुरवठा सबंधित कामांसाठी उपलब्ध निधीचे स्त्रोत</u><br>१. सत्राच्या या भागात प्रशिक्षणार्थीचे ५ गट करावेत. व प्रत्येक गटास खालील विषय देवून प्रत्येक विषयास अनुसरून गावात नेमकी कोण-कोणती कामे करावी लागतील याची यादी तयार करण्यास सांगावी. (प्रत्येक गटाला गटकार्य करण्यासाठीचा कालावधी – १० मि. सादरीकरणासाठीचा कालावधी ३ मि. द्यावा )<br>**गट क्र.१.** स्त्रोत बळकटीकरणासाठी करावी लागणा-या कामांची यादी<br>**गट क्र.२.** पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधांच्या देखभालीसाठी कराव्या लागणाऱ्या कामांची यादी<br>**गट क्र.३.** पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधांच्या दुरुस्तीसाठी कराव्या लागणाऱ्या कामांची यादी<br>**गट क्र.४.** संस्थात्मक व्यवस्थापनासाठी करावी लागणारे कामे<br>२. गटाचे सादरीकरण झाल्यानंतर तक्ता क्र. ११ मध्ये दिल्यानुसार खेळाचे आयोजन करून निधीचे स्त्रोत कसे शोधायचे याची कार्यपद्धत समजून सांगावी. खेळ व गटकार्य पूर्ण झाल्यानंतर खाली दिलेल्या योजनांमधून निधी/संसाधने उपलब्ध करून घेण्याची कार्यपद्धत सादरीकरणाच्या माध्यमातून सविस्तर समजून सांगावी. |

| | |
|---|---|
| | ▪ रोजगार हमी योजना<br>▪ जल शक्ती अभियान<br>▪ महाराष्ट्र ग्रामीण जीवन्नोती अभियान<br>▪ आमदार खासदार निधी<br>▪ CSR निधी इ. |
| **२० मिनिटे** | **भाग २: पाणी पुरवठा व स्वच्छता कामांसाठी १५ वा वित्त आयोगातील तरतुदी**<br>१. गटकार्यातून गावात करावयाच्या कामांची यादी तयार झाल्यानंतर सदर कामे करण्यासाठी १५ वा वित्त आयोगातून जर बंधित व अबंधित रक्कम रु. १५ लाख मिळणार असेल तर या प्राप्त होणाऱ्या निधीचा विचार करून खालील प्रश्नांची उत्तरे गट चर्चेतून शोधण्यास सांगा.<br>- प्राप्त होणाऱ्या निधीचा विचार करता कामांचा प्राधान्यक्रम कसा निश्चित कराल?.<br>- पाणी पुरवठा व स्वच्छता संबंधित कामासाठी प्राप्त निधीच्या एकूण किती टक्के निधी वापरणार?<br>- निधीचा विनियोग कसा करणार?<br>२. वर दिलेल्या मुद्यांच्या आधारे गटकार्य झाल्यानंतर प्रत्येक गटास गटकार्य सादर करण्यास सांगा.<br>३. सादर केलेल्या मुद्द्यावर चर्चा घडवून आणावी. आवश्यकतेनुसार महत्वाचे मुद्दे अधोरेखीत करावेत. |
| **१५ मिनिटे** | **भाग ३: प्रस्तावित कामांचा अंतर्भाव ग्राम विकास आराखड्यात करण्याची कार्यपद्धत**<br>१. सत्राच्या या भागात आराखडा मंजुरी प्रक्रिया समजून सांगा व त्यानंतर सदर मंजूर आराखड्याचा अंतर्भाव **e-gramswaraj** संकेस्थळावर करण्याची कार्यपद्धत समजून सांगावी व सत्राचा समारोप करावा. |

**या सत्राविषयीचे सादरीकरण पाहण्यासाठी वरील QR code स्कॅन करा**

# तक्ता क्र. ११ निधीच्या स्त्रोतांचा शोध (खेळ)

- सर्वप्रथम प्रशिक्षणार्थी मधून १० – १० सहभागींचे दोन गट करावेत.
- उर्वरित प्रशिक्षणार्थींना दोन गटांना मदत करण्यास सांगावे
- दोनही गटातील सहभागी सदस्याजवळ ज्या काही वस्तू उपलब्ध आहेत (उदा. हात, कमरेचा पट्टा, हात रुमाल, ओढणी, पेन) या वस्तूंचा वापर करून जास्तीत जास्त मोठी लाईन तयार करण्यास सांगावी. ज्या गटाची लाईन सर्वात मोठी होईल तो गट विजेता राहील. ( वस्तूंबाबत सुचना देताना वर निर्देशित केलेल्या उदाहरणातील वस्तूंची नावे सांगू नयेत.)
- स्वतः जवळ असलेल्या वस्तुचाच वापर करून लाईन तयार करण्याची स्पष्ट सुचना द्यावी .
- लाईन तयार करण्यासाठी ३ मि. कालावधी द्यावा.
- खेळाचा कालावधी संपल्यानंतर विजेत्या गटाची घोषणा करावी व खालीलप्रमाणे निधीच्या स्त्रोतांचा शोध कसा घ्यावा या बाबत चर्चा करावी.

मोठी लाईन बनविण्यासाठी तुम्ही तुमच्या जवळ असलेल्या सर्व वस्तू एक पाठोपाठ एका लाईन मध्ये ठेवल्या. याचा अर्थ कोणतेही काम करण्यासाठी आवश्यक असलेली संसाधने आपल्या जवळ उपलब्ध असतात मात्र आपणास ती ओळखता येत नाहीत किंबहुना त्याचा कधी व कसा वापर करायचा याबाबत आपण विचार ही करत नाही. याचप्रमाणे आपल्या गावात विविध विकासाची कामे करण्यासाठी आज कित्येक संसाधने उपलब्ध आहेत. कदाचित हि संसाधने आपल्या गावात असतील किंवा गावाबाहेरून देखील उपलब्ध करून घ्यावी लागतील. फक्त गरज आहे ती अशा संसाधनाचा योग्य पद्धतीने शोध घेवून, त्या संसाधनाचा कधी व कसा वापर करायचा याची. असे बोलून झाल्यानंतर भाग क्र. १ मधील केलेल्या गटकार्याचा चार्ट पेपर परत सहभागींना द्यावा व प्रत्येक कामासाठी आवश्यक असलेली संसाधने प्रत्येक कामा पुढे लिहिण्याची विनंती करावी.

## सत्र क्र. ३.३ जल समृध्द व स्वच्छ गाव निर्मितीसाठी समुदाय संगठन प्रक्रिया

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | १. गाव विकासात समुदाय संगठन आणि लोकसहभागाचे महत्व स्पष्ट व्हावे.<br>२. समुदाय संगठन प्रक्रियेत स्त्री-पुरुष समानतेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रेरित करणे<br>३. आपले गाव जल समृद्ध बनविण्यासाठीच्या पायऱ्या स्पष्ट व्हाव्यात |
| **सत्राचा कालावधी** | ६० मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • खुला संवाद<br>• गटकार्य<br>• व्याख्यान |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १:** गाव विकासात समुदाय संगठन आणि लोकसहभागाचे महत्व<br>**भाग २:** समुदाय संगठन प्रक्रिया<br>**भाग ३:** जल समृद्ध व स्वच्छ गाव बनविण्यासाठीच्या पायऱ्या |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ सादरीकरण<br>▶ मार्कर<br>▶ फलक<br>▶ गट कार्य |

**या सत्राविषयीचे सादरीकरण पाहण्यासाठी वरील QR code स्कॅन करा**

# सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| २० मिनिटे | <u>भाग १: गाव विकासात समुदाय संगठन आणि लोकसहभागाचे महत्व</u><br><br>१. सत्राच्या या भागात प्रशिक्षणार्थींना खालील प्रश्न विचारा<br>- आपण समाजात का राहतो?<br>- वैयक्तिक विकासाबरोबर सामाजिक विकास महत्वाचा आहे असे वाटते का?<br>- सामाजिक विकासामध्ये महत्वाचे घटक कोण कोणते आहेत?<br>- सामाजिक विकासामध्ये लोकसहभाग मिळविण्यासाठी काय करावे लागेल?<br><br>२. वरील प्रश्नांवर प्रशिक्षणार्थींचे मत जाणून घ्या<br><br>३. तक्ता क्र. १२ मध्ये दिल्यानुसार खेळाचे आयोजन करा. त्यानंतर खालीलप्रमाणे सादरीकरण मध्ये दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सत्राचे सुलभीकरण करा.<br>• परस्पर अवलंबित सामाजिक जीवन, आपलेपणाची भावना, संस्कार, विकास, श्रद्धा, संस्कृती, मूल्ये, धर्म, प्रदेश, भाषा इ. बाबींवर समाज आधारलेला असतो.<br>• वैयक्तिक विकास बरोबर सामाजिक विकास हि तितकाच महत्वाचा असतो. सामाजिक विकास हा वैयक्तिक विकासाचा पाया आहे, तो साधण्यासाठी पुरेसे पाठबळ आणि सकारात्मक उर्जा समाजातुनच मिळत असते.<br>• पारदर्शकता, समानता, लोक सहभाग, स्वमालकीची भावना, महिलांचा सहभाग, उत्तरदायित्व इ. बाबी सामाजिक विकासाचे मुख्य घटक आहेत.<br>• लोकसहभाग मिळविण्यासाठी व्यवस्थेवरचा विश्वास दृढ करणे, एकमेकांच्या मत आणि विचारांचा आदर करणे, जागृत समाज निर्माण करणे, नेतृत्व कौशल्य विकसित करणे, पारदर्शकता, उत्तरदायित्व, महिलांच्या सहभागावर भर देणे, नियम व अटी लावणे इ. बाबींवर भर द्यावा लागेल. |
| २० मिनिटे | <u>भाग २. समुदाय संगठन प्रक्रिया</u><br><br>१. सत्राच्या या भागात खालील विषयास अनुसरून प्रशिक्षणार्थींना गटकार्य करण्यास सांगावे (गट कार्याचा कालावधी ५ मिनिटे व सादरीकरणाचा कालावधी ३ मिनिटे)<br>- तुमच्या गावात स्त्रोत बळकटीकरणाचे काम श्रमदानातून करण्यासाठी तुम्ही काय कराल<br>- तुमच्या गावात सांडपाणी व्यवस्थापनासाठी वैयक्तिकस्तरावर शोषखड्डे बांधण्यासाठी कुटुंबाना कसे तयार कराल.<br>- तुमच्या गावातील नळ पाणी पुरवठा योजना सुरळीत चालविण्यासाठी आवश्यक असलेली पाणीपट्टी गोळा करण्यासाठी तुम्ही काय कराल<br>- तुमच्या गावात ग्रामसभेमध्ये ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहण्यासाठी तुम्ही काय कराल<br><br>२. गट कार्य करताना जाणीव-जागृती, नियोजन, अमलबजावणी, निधीची जुळवाजुळव आणि मुल्यांकन या ५ मुद्द्यावर विचार करून गटकार्य करण्याची विनंती करा. |

| | |
|---|---|
| | ३. गटांचे सादरीकरण झाल्या नंतर समुदाय संगठन करण्यासाठी नियोजन, अमलबजावणी आणि मूल्यांकनाचे महत्व समजून सांगावे. याच बरोबर सामाजिक संघटनाच्या माध्यमातून एखादी गोष्ट साध्य करण्यासाठी निर्णयक्षम व्यक्तींनी एकत्र येवून काम करण्याची गरज विषद करावी. |
| **२० मिनिटे** | **भाग ३. जल समृद्ध व स्वच्छ गाव बनविण्यासाठीच्या पायऱ्या**<br><br>सत्राच्या या भागात खाली दिलेल्या मुद्यांच्या आधारे जल समृद्ध व स्वच्छ गाव बनविण्याच्या पायऱ्या विषद कराव्यात.<br><br>• जल समृद्ध गाव कृती आराखड्याची निर्मिती<br>• जल व मृद संधारणाची कामे हाती घेणे<br>• स्त्रोतांचे संरक्षण<br>• पाण्याच्या मागणीवर नियंत्रण<br>• पारंपारिक स्त्रोतांचे जतन करणे<br>• पाण्याची बचत करणे<br>• पाणी पुरवठा सुविधांची निर्मिती करणे<br>• पाणी पुरवठा सुविधांची देखभाल व दुरुस्ती करणे<br>• सांडपाणी व्यवस्थापन, पुनर्वापर सामुदायिक जल व्यवस्थापन<br><br>• स्वच्छ गाव कृती गाव कृती आराखड्याची निर्मिती<br>• स्वच्छतेची कामे हाती घेणे<br>• प्लास्टिक कचरा निर्मुलन करणे<br>• सांडपाणी व्यवस्थापनासाठी वैयक्तिक व सामुदायिक स्तरावर योग्य तांत्रिक उपायांची अंमलबजावणी करणे<br>• गोबर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे<br>• दोन खड्ड्याच्या शौचालयाच्या बांधकामास प्रोत्साहन देणे |

## तक्ता क्र. १२ गावाच्या समस्या गावानेच सोडवायच्या (खेळ)

प्रशिक्षणार्थीमधून एक व्यक्तीस पुढे बोलावून तो जिल्ह्याचा एक अधिकारी असल्याचे सांगावे.या अधिकाऱ्यास थोडा वेळ वर्गाच्या बाहेर उभे राहण्यास सांगावे व वर्गात काय चालले आहे हे त्याला समजणार नाही याची खात्री करावी.उर्वरित सर्व प्रशिक्षणार्थींना एक मोठा गोल करून एकमेकांच्या हातात हात देण्यास सांगावे. आता गोल साखळीतील एक प्रशिक्षणार्थीने दुसऱ्या प्रशिक्षणार्थीच्या हाताखालून जायला सांगावे. पण असे करताना कोणीही हात सोडू नये. अशारितीने आता साखळीला एक गाठ पडेल व सर्वांचे हात उलटे सुलटे होतील.त्यातून साखळीत एक गुंता तयार होईल. ही प्रक्रिया वारंवार करावी जेणेकरून साखळीत जास्त गुंता होईल. आता बाहेरील अधिका-यास वर्गात बोलावून झालेला गुंता सोडविण्यास सांगावे. प्रयत्न करूनही गुंता अधिकाऱ्याकडून सुटणार नाही. आता हात न सोडता पुर्वरत गोल साखळी करण्याची विनंती करावी व प्रशिक्षणार्थींना खालील प्रश्न विचारावेत.

1. गावाचे प्रश्न आणि गावातील समस्या अधिक कुणाला माहित आहेत?
2. गावाचे प्रश्न गावाने एकत्र सोडविले पाहिजेत की बाहेरील व्यक्तीने?
3. गावाचे प्रश्न सोडविण्यासाठी बाहेरच्या लोकांचा उपयोग होईल का?

## सत्र क्र. ३.४ नेतृत्व विकास

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | १. नेतृत्व विकासाची संकल्पना व नेतृत्वाचे महत्व आणि गरज या बाबत असलेल्या माहितीमध्ये वृध्दी करणे.<br>२. चांगल्या नेतृत्वाची तत्वे व त्यासाठी आवश्यक असलेली गुणवैशिष्ट्ये अवगत करणे.<br>३. नेतृत्व शैलीचे प्रकार अवगत करणे.<br>४. कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गट बांधणीचे महत्व व त्याच्या बांधणीची कार्यपध्दत अवगत व्हावे. |
| **सत्राचा कालावधी** | ९० मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • खेळ<br>• खुला संवाद<br>• कल्पनाविस्फोट<br>• व्याख्यान |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १:** नेतृत्व विकासाची संकल्पना व नेतृत्वाचे महत्व आणि गरज<br>**भाग २:** चांगल्या नेतृत्वाची तत्वे व त्यासाठी आवश्यक असलेली गुणवैशिष्ट्ये<br>**भाग ३:** नेतृत्व शैलीचे प्रकार<br>**भाग ४:** नेतृत्व विकासाठी आवश्यक कौशल्य व ती विकसित करण्याची कार्यपध्दत |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ सादरीकरण<br>▶ स्केच पेन<br>▶ मार्कर<br>▶ फलक |

## सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| **१५ मिनिटे** | <u>भाग १: नेतृत्व विकासाची संकल्पना ,नेतृत्वाचे महत्व आणि गरज</u><br>१. सर्वप्रथम सत्रादरम्यान सादर करण्यात येणा-या विषयाबाबत विहंगावलोकन करा.<br>२. यानंतर सादरीकरणाच्या आधारे नेतृत्वाची संकल्पना स्पष्ट करा व सादरीकरणाच्या आधारे नेतृत्वाची व्याख्या, समजावुन सांगा.<br>३. विविध शासकीय कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून अपेक्षित ध्येय साध्य करण्यासाठी नेतृत्वाचे महत्व, गरज विषद करा. |

<table>
<tr>
<td>३० मिनिटे</td>
<td>
<u>भाग २. चांगल्या नेतृत्वाची तत्वे व त्यासाठी आवश्यक असलेली गुणवैशिष्टये</u><br>
खाली मुद्द्यांच्या आधारे चांगल्या नेतृत्वाची तत्वे स्पष्ट करवीत.
<table>
<tr>
<td>• स्वत:ची ओळख<br>• नेतृत्व हे वर्तन आहे हुद्दा नाही<br>• नेतृत्व म्हणजे स्वत:च्या उदाहरणातून लोकांना प्रभावित करणे<br>• नेतृत्व म्हणजे बदल घडवणे<br>• नेतृत्व म्हणजे स्पष्ट दूरदृष्टी</td>
<td>• नेतृत्व हे संपूर्णपणे लोकांकरीता असते<br>• नेतृत्व म्हणजे दूरदृष्टीचा उद्देश ठेवणे, नेतृत्वाची कृती ही शब्दापेक्षा जास्त परीणामकारक असते<br>• एकी ही खरी नेतृत्वाची खरी ताकद आहे<br>• जबाबदारी स्विकारणे</td>
</tr>
</table>
खाली मुद्द्यांच्या आधारे चांगल्या नेतृत्वाची गुणवैशिष्टये स्पष्ट करावीत.
<table>
<tr>
<td>• आत्मविश्वास<br>• एकनिष्ठता आणि प्रामाणिकपणा<br>• जिद्द आणि चिकाटी<br>• उत्तम संवाद कौशल्य<br>• धैर्य आणि संयम<br>• स्पष्ट दूरदृष्टी</td>
<td>• अचूक निर्णय<br>• मार्गदर्शन आणि प्रशिक्षण<br>• उत्कृष्ट समन्वय<br>• प्रेरणा व प्रोत्साहन<br>• सकारात्मक वृत्ती<br>• साधन सामग्रीची जुळवाजूळव करणे</td>
</tr>
</table>
यानंतर तक्ता क्र. १३ मध्ये दिलेल्या खेळाच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना स्वंय-मुल्यांकन करण्यास सांगावे.
</td>
</tr>
<tr>
<td>२० मिनिटे</td>
<td>
<u>भाग ३ नेतृत्व शैलीचे प्रकार</u><br>
सत्राच्या या भागात खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे नेतृत्व शैलीचे प्रकार स्पष्ट करावेत<br>
• दूरदृष्टी नेतृत्व<br>
• प्रशिक्षण नेतृत्व<br>
• सलंग्न नेतृत्<br>
• लोकशाही नेतृत्व<br>
• वेगवान नेतृत्व<br>
• हुकुमशाही
</td>
</tr>
<tr>
<td>२५ मिनिटे</td>
<td>
<u>भाग ४ नेतृत्व विकासाठी आवश्यक कौशल्य व ती विकसित करण्याची कार्यपध्दत</u><br>
सत्राच्या या भागात सादरीकरणाच्या आधारे गट व गट बांधणीची संकल्पना स्पष्ट करा.<br>
यानंतर खालील तक्ता क्र. १४ मध्ये दिल्यानुसार खेळाचे आयोजन करून गट बांधणीची कार्यपद्धत विषद करा व सत्राचा समारोप करा.
</td>
</tr>
</table>

**या सत्राविषयीचे सादरीकरण पाहण्यासाठी वरील QR code स्कॅन करा**

## तक्ता क्र. १३ : खेळाचे नाव : स्वयंमुल्यांकन नेतृत्वाची वैशिष्टय सूची

- **उद्देश :** नेतृत्व वैशिष्टयांचे स्वयंमुल्यांकन.
- **साहित्य :** वैशिष्टये सूचीच्या प्रती
- **वेळ :** १० मिनीटे
- **कृती :** प्रत्येक प्रशिक्षणार्थींला नेतृत्व वैशिष्टय सूचीची एक प्रत द्या.

- सूचीचा उद्देशनेतृत्व वैशिष्टयांचे स्वयंमुल्यांकन करणे आहे. ही सूची व या आधारे निघणारे निष्कर्ष फक्त एक ढोबळ मार्गदर्शक म्हणून वापरण्यात यावेत. हे समजावुन सांगा.
- सूची मध्ये रोजच्या कामकाजातील विधाने दिली आहेत, प्रत्येक विधानातील नमुद कार्य तुम्ही कशा प्रमाणात करता हे त्या विधानासमोर लिहायचे आहे. त्यासाठी खालील प्रमाणाचा वापर करा

**१ म्हणजे सर्वात कमी** — **५ म्हणजे सरासरी** — **१० म्हणजे सर्वात जास्त**

**विश्लेषण :** सूची भरुन संपल्यानंतर सर्व विधानांच्या गुणांची बेरीज करण्यास सांगा तदनंतर खालील प्रमाणे विश्लेषण करुन सांगा.

| गुण | तुमचे नेतृत्व |
|---|---|
| गुण ० ते २५ | खूप कमी दर्जाचे, तातडीने सुधारण्याची गरज |
| गुण २६ ते ४९ | सरासरी पेक्षा कमी, सुधारण्याची गरज |
| गुण ५० | सरासरी , सुधारण्याची गरज |
| गुण ५१ ते ७५ | सरासरीपेक्षा चांगले, सुधारणा होऊ शकते |
| गुण ७६ चे वर | उत्तम, ही स्थिती टिकवून ठेवा |

- ### स्वयंमुल्यांकन नेतृत्व वैशिष्टय सुची

खालील विधाने १ ते १० या प्रमाणावर निदेर्शीत करा

**(१ म्हणजे सर्वात कमी, ५ म्हणजे सरासरी १०, म्हणजे सर्वात जास्त)**

| | | |
|---|---|---|
| १ | ध्येय निर्मित करतांना मी सहका-यांना प्रभावित करतो. | |
| २ | ध्येय साध्य करण्यासाठी आवश्यकतेनुसार मी सहका-यांना मदत पुरवतो / पुरवते | |
| ३ | मी एक समस्या निरासक (Problem Solver)आहे. | |

| | | |
|---|---|---|
| ४ | मी कामाच्या क्षेत्रातील ज्ञानाविषयी अद्यावत राहतो / राहते. | |
| ५ | मी सहका-यांच्या कामगिरीची लक्षपूर्वक तपासणी व नोंद करतो /करते. | |
| ६ | मी मतभेद चांगल्या प्रकारे हाताळू शकतो / शकते. | |
| ७ | मी सहका-यांना नेहमी प्रेरत करतो / करते. | |
| ८ | मी नेहमी सकारात्मक असतो / असते. | |
| ९ | मी कामगिरीची लक्षपूर्वक तपासणी करतो /करते. | |
| १० | मी स्वत:च्या कामाची व वर्तनाची लक्षपूर्वक तपासणी व नोंद करतो /करते. | |
| ११ | मी इतरांचे मत नेहमी एकूण घेतो / घेते. | |
| १२ | मी माझ्या वेळचे नियोजन व व्यवस्थापन चांगल्या पद्धतीने करतो /करते. | |
| १३ | मला माझ्यातील जमेच्या बाजू व कमतरता माहीत आहेत. | |
| १४ | मी सहका-यांच्या कामाबद्दल विधायक अभिप्राय देतो / देते. | |
| १५ | मी सहका-याना प्रोत्साहित करुन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करतो. | |
| १६ | मी वेळोवेळी सहका-याची प्रशंसा करतो व त्यांना बक्षिसे देतो / देते. | |
| १७ | मी कठीण व ताण तणावाच्या परिस्थिला योग्य झुंज देतो / देते. | |
| १८ | मी योग्य कामासाठी योग्य व्यक्तीची निवड करतो/ करते. | |
| १९ | मी स्वत: शिस्तबद्ध वागतो व इतरांनाही तसे वागायला लावतो / लावते. | |
| २० | मी नवीन जबाबदारी स्वत:हुन स्विकारतो. | |

**तक्ता क्र १४. नाव :गट बांधणीचा खेळ**

**उद्देश** - गट बांधणी बाबत स्पष्टता आणणे.

**साहित्य** - वेगवेगळया आकाराचे व वेगवेगळया रंगाचे १० चेंडू.

**वेळ** - १५ मिनीटे

**कृती** -५ किवा ६ सदस्यांचे गट करा व त्यांना त्यांच्या गटास नाव देण्यास सांगा.

**सर्वांना खालील नियम समजावून सांगा.**

- प्रत्येक गटातील ५ सदस्य प्रत्यक्ष हा खेळ खेळतील, गटातील ५ सदस्य वर्तूळ करुन उभे राहतील
- गट प्रमुखाकडे चेंडु पुरवण्यात येतील, त्याला चेंडु सर्व सदस्यांकडुन पास करुन परत द्यायचा आहे.
- प्रत्येक गटाला २ मिनिटे मिळतील, २ मिनिटात किती पास व किती ड्रॉप होतील हे ध्येय प्रत्येक गटाकडुन ठरवून घ्या.
- पास करतांना प्रत्येक सदस्य आपापल्या तत्काळ उजव्या किंवा डाव्या बाजुला उभ्या सदस्या कडे पास करु शकणार नाही

**विश्लेषण :** एका वेळेस एक गट खेळेल, सर्व गट खेळल्या नंतर ध्येयाच्या तुलनेत प्रत्येक गटाचे किती पास व किती ड्रोप झाले याची बोर्डवर नोंद करा. प्रत्येक गट कसा तयार झाला, त्यांनी कशी कामगिरी केली, काय योग्य व अयोग्य केले हे सविस्तर समजावून सांगा.

## सत्र क्र. ३.५ पाणी पुरवठा सुविधांची शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठी कृती आराखड्याची निर्मिती

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | गावस्तरावर निर्माण झालेल्या पाणी पुरवठा सुविधेतून शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठीचा कृती आराखडा तयार करणे. |
| **सत्राचा कालावधी** | ४५ मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • खुला संवाद<br>• गट कार्य |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १:** कृती आराखडा निर्मिती व सादरीकरण |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | ▶ सादरीकरण<br>▶ स्केच पेन<br>▶ मार्कर<br>▶ फलक<br>▶ कृती आराखड्याची प्रत |

### सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| **४५ मिनिटे** | **भाग १: कृती आराखडा निर्मिती व सादरीकरण**<br>१. सत्राच्या सुरुवातीस सत्राचा उद्देश स्पष्ट करावा. यानंतर प्रशिक्षणार्थींना आपल्या गावातील इतर प्रतिनिधीबरोबर एकत्रित बसण्याची विनंती करावी.<br>२. यानंतर प्रत्येक गटास खालील तक्ता क्र. १५ देवून सदर तक्त्यात दिलेल्या कामे पूर्ण करण्याचा कालावधी नमूद करण्याची विनंती करावी.<br>३. आवश्यकतेनुसार तक्ता भरण्यास मदत करावी<br>४. गटांनी माहिती भरून झाल्यानंतर सदरचा तक्ता गटाकडून प्राप्त करून घ्यावा. तयार केलेल्या तक्त्याचे छायाचित्र काढण्यास सांगावे व सत्राचा समारोप करावा. |

### तक्ता क्र.१७ पाणी पुरवठा सुविधेतून शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठीचा कृती आराखडा

**ग्रामपंचायतीचे नाव** ______________ **तालुका**________________

**जिल्हा** ______________ **प्रशिक्षण कालावधी** _________________

| प्रशिक्षणास उपस्थित राहिलेल्या प्रशिक्षणार्थींचा तपशील | | | |
|---|---|---|---|
| **क्र.** | **नाव** | **पद** | **संपर्क क्र.** |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

| प्रस्तावित कामांचा तपशील व पूर्ण करण्याचा कालावधी | | |
|---|---|---|
| **क्र.** | **कामांचा तपशील** | **कालावधी** |
| १ | गाव बैठक | |
| २ | योजना कार्यान्वयन चाचणी | |
| ३ | योजना फेरीचे आयोजन | |
| ४ | ग्रामसभा आयोजन व योजना पूर्णत्व अहवालाची प्रक्रिया | |
| ५ | हर घर जल ची घोषणा | |
| ६ | पाण्याचे अंदाज पत्रक | |
| ७ | स्त्रोत बळकटीकरणासाठी उपाय योजनांची निश्चिती | |
| ८ | स्वच्छता सबंधित कामांची अंमलबजावणी | |
| ९ | स्वच्छता सर्वेक्षणाचे आयोजन व पाणी गुणवत्ता व्यवस्थापनासाठी योग्य उपाययोजनांची निश्चिती | |
| १० | सुविधांच्या संचालन देखभाल व दुरुस्तीसाठी योग्य व्यवस्थेची निवड | |
| ११ | पाणीपट्टी व स्वच्छता कर अंदाजपत्रक तयार करणे व कर वसुलीसाठी योग्य व्यवस्थेची निवड | |
| १२ | निर्माण झालेल्या उपांगांची मालमत्ता नोंदवहीत नोंदी | |
| १३ | वेगवेगळया नोंदवह्या तयार करणे व त्याचे दस्तावेजीकरण | |

## सत्र क्र. ३.६ प्रशिक्षणाचा समारोप

| | |
|---|---|
| **सत्राचा उद्देश** | १. प्रशिक्षण कालावधी शिकविण्यात आलेल्या मुद्यांचा आढावा घेणे<br>२. प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षणाबाबतचा अभिप्राय घेणे<br>३. प्रशिक्षणपश्चात प्रश्नावली भरून घेणे |
| **सत्राचा कालावधी** | ३० मिनिटे |
| **सत्र सुलभीकरणाची पद्धत** | • खुला संवाद<br>• व्याख्यान |
| **सत्रा दरम्यान हाताळले जाणारे विषय** | **भाग १:** प्रशिक्षण कालावधीतील मुद्यांचा आढावा<br>**भाग २:** प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण सत्रासंबंधीचा अभिप्राय<br>**भाग ३:** प्रशिक्षणपश्चात प्रश्नावली व समारोप |
| **सत्रासाठी आवश्यक साधन सामग्री** | |

## सत्र सुलभीकरणाची कार्यपद्धत

| वेळ | सुलभीकरणाची प्रक्रिया |
|---|---|
| **१० मिनिटे** | **भाग १: प्रशिक्षण कालावधीतील मुद्यांचा आढावा**<br>तीन दिवसाच्या कालावधीत सुलभ करण्यात आलेल्या विषयांचा आढावा घ्या व संबधित विषयास अनुसरून काही शंका असल्यास त्याचे निरसन करा. |
| **१० मिनिटे** | **भाग २: प्रशिक्षणपश्चात प्रश्नावली**<br>प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी दिलेली प्रश्नावली प्रशिक्षणार्थींना देवून प्रश्नांची उत्तरे लिहण्यास विनंती करा.<br>प्रश्नावली भरून झाल्यानंतर ती प्राप्त करून घ्या. |
| **१० मिनिटे** | **भाग ३: प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण सत्रासंबंधीचा अभिप्राय व समारोप**<br>मान्यवरांचे आगमन झाल्यानंतर त्यांचे स्वागत करा व काही निवडक प्रशिक्षणार्थींना अभिप्राय नोंदविण्यासाठी आमंत्रित करा.<br>यानंतर मान्यवरांना आपले मनोगत मांडण्याची विनंती करा व प्रशिक्षणाचा समारोप करा. |

## विषय: पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधेतून शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठीची आकांक्षा

‘प्रशिक्षकांचे प्रशिक्षण’

# नोंदणी पत्रक

स्थळ ..........................  कालावधी .....................

| क्र. | प्रशिक्षणार्थीचे नाव | पद | जिल्हा | तालुका | ग्राम पंचायत | संपर्क क्र. | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | | |
| २. | | | | | | | |
| ३. | | | | | | | |

## विषय: पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधेतून शाश्वत सेवा प्रदान करण्यासाठीची आकांक्षा

प्रशिक्षकांचे प्रशिक्षण

# हजेरी पत्रक

स्थळ ...........................                                        कालावधी ......................

| क्र. | प्रशिक्षणार्थीचे नाव | पद | जिल्हा | तालुका | ग्राम पंचायत | स्वाक्षरी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | दिवस १ | दिवस २ | दिवस ३ |
| १. | | | | | | | | |
| २. | | | | | | | | |
| ३. | | | | | | | | |

# प्रशिक्षणपूर्व / प्रशिक्षण पश्चात प्रश्नावली

**प्रशिक्षणार्थीचे नाव :** **पद :**

**प्रशिक्षण स्थळ : ----------------------------------कालावधी:** दिनांक: ----- ते ---- / /२०२.......

**टिप :** योग्य पर्यायास ( √ ) खूण करून खालील प्रश्नांची उत्तरे दयावीत. **(वेळ : १०** मिनीटे)

.................................................................................................................

**१) संयुक्त राष्ट्र संघाने स्विकारलेले शाश्वत विकासाचे एकूण किती ध्येय आहेत?**

अ. ७ ☐ ब. १० ☐
क. १५ ☐ ड. १७ ☐

**२) खालीलपैकी कोणते घटक जलसमृध्द गावामध्ये समाविष्ट नाही?**

अ. जलसंसाधन व्यवस्थापन ☐ ब. पाण्याची बचत ☐
क. हागणदारीमुक्त गाव ☐ ड. पाणी गुणवत्ता व्यवस्थापन ☐

**३) स्रोत बळकटीकरणासाठी खालीलपैकी कोणत्या अपारंपारिक उपाययोजना हाती घेता येऊ शकतात?**

अ. फ्रॅक्चर सील सिमेंटेशन ☐ ब. गॅबीयन बंधारा ☐
क. भूमिगत बंधारा ☐ ड. सिमेंट नाला बंधारा ☐

**४) पाणी निर्जंतुकीकरणासाठी १००० लिटर पाण्यामध्ये १० ग्रॅम TCL पावडर चा वापर करणे अपेक्षीत आहे?**

अ. चूक ☐ ब. बरोबर ☐

**५) घन कचरा व्यवस्थापनातील घटकांचा खालीलपैकी योग्य क्रम कोणता**

अ. वर्गीकरण, संकलन, वाहतूक व अंतिम व्यवस्थापन ☐ ब. संकलन, वाहतूक, वर्गीकरण व अंतिम व्यवस्थापन ☐

६) गावात प्राप्त होणाऱ्या एकूण पेयजलातून किती सांडपाणी तयार होते ?

अ. ५५% ☐ ब. ६५% ☐
क. ७५% ☐ ड. ८०% ☐

७) योजनेची कार्यान्वयन चाचणीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराने ग्रा.पं.स्तरावरील सर्व भागधारकांसोबत योजनो फेरीचे आयोजन करणे महत्वाचे आहे ?

अ. चूक ☐ ब. बरोबर ☐

८) हर घर जल घोषणा करण्यासाठी ग्रा.पं. ने ग्रामसभेचे आयोजन कोणत्या ठिकाणी करणे अपेक्षीत आहे?

अ. गावाच्या मुख्य ठिकाणी ☐ ब. ग्रामपंचायती शेजारी ☐
क. जिथून नळ पाणी पुरवठा अशा सुविधा सहज दिसू शकतील अशा ठिकाणाहून ☐

९) खालील पैकी कोणत्या वाक्याचा योग्य क्रम आहे ?

अ. कार्यान्वयन चाचणी, योजना फेरी, योजना पूर्णत्व अहवाल, हर घर जल घोषणा ☐
ब. योजना फेरी कार्यान्वयन चाचणी, योजना पूर्णत्व व अहवाल, हर घर जल घोषणा ☐
क. योजना पूर्णत्व अहवाल, योजना फेरी, कार्यपूर्णत्व अहवाल, हर घर घोषणा ☐

१०) पुढीलपैकी कोणती प्रशिक्षण पध्दती नाही?

अ. यशोगाथा ☐ ब. अनुभव कथन ☐
क. सामाजिक खेळ ☐ ड. संशोधन ☐

# शाश्वत विकास ध्येये


1 NO POVERTY
2 ZERO HUNGER
3 GOOD HEALTH AND WELL-BEING
4 QUALITY EDUCATION
5 GENDER EQUALITY
6 CLEAN WATER AND SANITATION
7 AFFORDABLE AND CLEAN ENERGY
8 DECENT WORK AND ECONOMIC GROWTH
9 INDUSTRY, INNOVATION AND INFRASTRUCTURE
10 REDUCED INEQUALITIES
11 SUSTAINABLE CITIES AND COMMUNITIES
12 RESPONSIBLE CONSUMPTION AND PRODUCTION
13 CLIMATE ACTION
14 LIFE BELOW WATER
15 LIFE ON LAND
16 PEACE, JUSTICE AND STRONG INSTITUTIONS
17 PARTNERSHIPS FOR THE GOALS